सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

विदर्भाला ५५७ कापूस खरेदी केंद्रांची गरज, पण केवळ ८९ केंद्रे सुरू

हायकोर्टाने कापूस महामंडळाला फटकारले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६नागपूर

विदर्भामध्ये १६ लाख ८६ हजार ४८५ हेक्टर शेतजमिनीवर कापूस लागवड करण्यात आली असून, त्यातून उत्पादित होणारा कापूस विकण्यासाठी शेतकऱ्यांना एकूण ५५७ केंद्रांची आवश्यकता आहे. परंतु, भारतीय कापूस महामंडळाने आतापर्यंत केवळ ८९ केंद्रे सुरू केली आहेत. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी महामंडळाला फटकारले व यासह इतर विविध मुद्द्यांवर तीन आठवड्यांत स्पष्टीकरण सादर करण्याचा आदेश

दिला.

यासंदर्भात ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा सचिव श्रीराम सातपुते यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्ती अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. दरम्यान, या प्रकरणातील न्यायालय मित्र ॲड. पुरुषोत्तम पाटील यांनी प्रतिज्ञापत्र सादर करून कापूस महामंडळाची उदासीन भूमिका व शेतकऱ्यांच्या अडचणींची माहिती दिली. १० लाख ३९ हजार ५०९ हेक्टर शेतजमिनीवर कापूस लागवड असलेल्या नागपूर विभागाला २१३ आणि १० लाख ३९ हजार ५०९ हेक्टर शेतजमिनीवर कापूस लागवड असलेल्या अमरावती विभागाला ३४४ खरेदी केंद्रांची गरज आहे, पण याठिकाणी अनुक्रमे ३५ व ५४ केंद्रेच सुरू करण्यात आली आहेत. एवढेच नाही तर, महामंडळ गेल्या काही वर्षापासून नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात कापूस खरेदी सुरू करीत आहे. यावर्षीही तसेच झाल्याने शेतकऱ्यांनी बराचसा कापूस खासगी व्यापाऱ्यांना एक हजार रुपये कमी दराने विकला आहे. त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले, असे ॲड. पाटील यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी कापूस खरेदी सिलिंग व आर्द्रता टक्केवारी वाढविण्याची गरज आहे, याकडेही ॲड. पाटील यांनी लक्ष वेधले. महामंडळाने 'कपास किसान' ॲप आणले असून, कापूस विकण्यासाठी शेतकऱ्यांनी या ॲपवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. परंतु, त्यात पाच क्विंटल प्रति एकर, अशी सिलिंग आहे. विदर्भात कापसाचे सरासरी ६ ते १० क्विंटल एकरी उत्पादन होते. त्यामुळे सिलिंग १० क्विंटल करणे आवश्यक आहे. याशिवाय, महामंडळ केवळ १२ टक्क्यांपर्यंत आर्द्रतेचाच कापूस खरेदी करते. ही मर्यादा १५ टक्क्यांपर्यंत वाढवणे आवश्यक आहे, असे ॲड. पाटील यांनी सांगितले.

महामंडळाला या सूचनाही करण्यात आल्या

१ - महामंडळाने दरवर्षी ३१ सप्टेंबर किंवा त्यापूर्वी कापूस खरेदी सुरू करावी.

२ - नोंदणी व स्लॉट बुकिंग अनिवार्य करू नये. शेतकऱ्यांना ऑनलाइन आणि ऑफलाइन या दोन्ही सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

३ - किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने कापूस विकावा लागलेल्या शेतकऱ्यांना महामंडळाने भरपाई अदा करावी.

४ - कपास किसान ॲपच्या उपयोगाविषयी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. नोंदणी प्रक्रिया सुलभ करावी.

५ - कापूस खरेदी केंद्रे दरवर्षी एप्रिल अखेरपर्यंत कार्यरत ठेवावीत.

कापूस लागवड व खरेदी केंद्रांचे चित्र

जिल्हा	कापूस लागवड हेक्टरमध्ये	खरेदी केंद्रे सुरू	एकूण केंद्रे आवश्यक
यवतमाळ	४ लाख ९६ हजार ९१६	१८	१६५
अमरावती	२ लाख ४३ हजार ७२९	१४	८१
नागपूर	२ लाख २१ हजार ५७०	११	७३
वर्धा	२ लाख १६ हजार ८२३	१३	७२
अकोला	१ लाख ३६ हजार ८५८	०९	४५
बुलढाणा	१ लाख २९ हजार ८१०	०९	४३
चंद्रपूर	१ लाख ९१ हजार ४३७	१०	६३
गडचिरोली	१६ हजार २०१	०१	०५
वाशिम	३२ हजार १९५	०४	१०
भंडारा	९४४	००	००
गोंदिया	०२	००	००
एकूण	**१६ लाख ८६ हजार ४८५**	**८९**	**५५७**

इम्रान खान यांची तुरुंगात हत्या?

अफगाणी मीडियाचा मोठा दावा, पाकिस्तानात खळबळ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६कराची

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इमरान खान यांचा रावळपिंडीच्या आदियाला जेलमध्ये हत्या/मृत्यू झाल्याची चर्चा/अफवा पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या माध्यमांमध्ये पसरली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अफगाण टाईम्सने सूत्रांच्या हवाल्याने ही बातमी समोर आणली, मात्र पाकिस्तान सरकार, जेल प्रशासन किंवा सैन्य यापैकी कुणीही याबाबत अधिकृत वक्तव्य केलेले नाही. त्यामुळे परिस्थिती अधिकच संशयास्पद बनली आहे. दैनिक विदर्भ प्रजासत्ताक देखील या दाव्याची पुष्टी करत नाही.

इम्रान खान यांच्या मृत्यूची अफवा पसरल्यानंतर पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (झढख) पक्षाचे चे हजारो समर्थक आदियाला जेलबाहेर जमू लागले आहेत. रिपोर्ट्सनुसार, स्वतः इमरान खान यांनी हत्या होण्याची भीती काही आठवड्यांपूर्वीच व्यक्त केली होती. इमरान म्हणाले होते, जेलमध्ये माझ्यासोबत काही घडले, तर त्यासाठी सेनाप्रमुख आसिम मुनीर जबाबदार असेल. दरम्यान, वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या दहशतवादविरोधी संस्थेने हाय अलर्ट जारी केली आहे.भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये इमरान खान आणि त्यांची पत्नी बुशरा बीबी २०२३ पासून आदियाला जेलमध्ये आहेत. गेल्या तीन आठवड्यांपासून त्यांना कोणालाही भेटण्याची परवानगी दिली गेलेली नाही, असा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

रावळपिंडीतील आंदोलने तीव्र

मंगळवारी (२५ नोव्हेंबर) मोठ्या प्रमाणात झढख समर्थकांनी रावळपिंडीमध्ये निदर्शने केली. यात इमरान खान यांची बहीण आलिमा खानदेखील सहभागी झाल्या. त्यांनी आरोप केला की, आम्हाला तीन आठवड्यांपासून भेटण्यास मनाई केली जात आहे.

अफगाण टाईम्सने सूत्रांच्या हवाल्याने इमरान खानच्या मृत्यूची बातमी प्रसिद्ध केली. सरकारने याचे ना खंडन केले, ना पुष्टी केली, त्यामुळेच शंका आणखी वाढली. डॉनचे वरिष्ठ पत्रकार इफ्तिखार यांनी सांगितले की, गेल्या काही आठवड्यांपासून डॉक्टर, वकील किंवा कुटुंबातील कोणालाही इमरान खानला भेटू दिले नाही. त्यांच्या प्रकृतीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही. जेलमध्ये असलेल्यांनाही सात दिवसांपासून इमरान खान दिसले नसल्याची माहिती आहे. यामुळेच मृत्यूच्या चर्चांना आणखी खतपाणी मिळाले आहे.

भाजपाची ठोकशाही सहन करणार नाही, सत्तेचा माज उतरायला वेळ लागणार नाही : हर्षवर्धन सपकाळ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६मुंबई

अहिल्यानगर जिल्ह्याचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांचे अपहरण करून मारहाण करण्यात आलेली घटना अत्यंत गंभीर व निषेधार्ह आहे. संविधान दिनाच्या दिवशी भाजपाने सकाळी लोकशाहीची हत्या केली आहे. २६-११ च्या दिवशी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतावर हल्ला केला होता तोच मुहूर्त साधून अहिल्यानगर जिल्ह्यात लोकशाहीचा खून पाडला आहे. ऐन निवडणुकीत एका राष्ट्रीय पक्षाच्या जिल्हाध्यक्षाला अपहरण करून मारहाण होते, हे काँग्रेस पक्ष कदापि सहन करणार नाही, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, नगर जिल्ह्यात घडलेली ही घटना अत्यंत निषेधार्ह व गंभीर आहेच परंतु महाराष्ट्रात लोकशाही अस्तित्वात आहे की नाही ? असा प्रश्न उपस्थित करणारी आहे. भाजपा सरकारने आपले कारनामे दाखवायला सुरुवात केली आहे. नगरमध्ये झालेली ही काही पहिलीच घटना नाही. नगरपालिकेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या काँग्रेसच्या दोघांना याआधी रात्री अटक करून कस्टडीत टाकण्यात आले, त्यांना मारहाण करण्यात आली, त्यानंतर

पोलीसांनी त्यांच्या गाडीतून या दोघांना भाजपाचा माजी खासदार सुजय विखे पाटील व मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे घेऊन गेले, त्यांना दमदाटी करण्यात आली, हा सर्व प्रकार चित्रपटात दाखवतात तसा आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली.दरम्यान, फडणवीसांना दरिंदा म्हटले ते त्यांच्या बगलबच्च्यांना मिरच्या झोंबल्या. पण आम्ही जे बोललो ते योग्यच होते ही अहिल्यानगरच्या घटनेने ते पुन्हा एकदा दाखवूनही दिले आहे. भाजपाला लोकशाही व संविधान मान्य नसून ठोकशाही सुरू केली आहे. विरोधी पक्षाने निवडणूका लढवायच्या की नाही, असा प्रश्न या घटनेवरून उपस्थित होत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी गुंड बगलबच्च्यांना आवर घालावा, सत्तेचा माज उतरायला वेळ लागत नाही, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला.

पाकिस्तानपेक्षाही कमकुवत झाली टीम इंडिया

९३ वर्षांत पहिल्यांदा ४०० धावांनी पराभव, देशातच एका वर्षात दुसऱ्यांदा क्लीन स्वीप

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६गुवाहाटी

दक्षिण आफ्रिकेने दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताचा २-० असा धुव्वा उडवला आहे. गुवाहाटी कसोटीच्या पाचव्या दिवशी ५४९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या भारतीय संघाने आपल्या दुसऱ्या डावात १४० धावांत सर्व गडी गमावले. दक्षिण आफ्रिकेने हा सामना ४०८ धावांनी जिंकला. भारताला आपल्या ९३ वर्षांच्या कसोटी इतिहासात पहिल्यांदाच ४०० पेक्षा जास्त धावांच्या फरकाने पराभव पत्करावा लागला आहे.

गेल्या एका वर्षात भारतीय संघाचा घरच्या मैदानावर ७ कसोटी सामन्यांमधील हा पाचवा पराभव आहे. या काळात भारताला दोनदा घरच्या मैदानावर क्लीन स्वीप व्हावे लागले आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये न्यूझीलंडने भारताला तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत ३-० असे हरवले होते.एक वर्षापूर्वीपर्यंत घरच्या मैदानावर अजिंक्य मानला जाणारा भारतीय संघ यावेळी घरच्या मैदानावर जगातील सर्वात कमकुवत संघांपैकी एक बनला आहे. गेल्या १३ महिन्यांत पाकिस्ताननेही भारतापेक्षा चांगला खेळ दाखवला आहे. या कालावधीत घरच्या मैदानावर भारतापेक्षा जास्त सामने फक्त झिम्बाब्वे संघाने गमावले आहेत.

विसर्जन सोहळ्यात ध्वनीमर्यादेचे उल्लंघन पुण्यातील २०० हुन अधिक मंडळांना नोटीसा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६पुणे

गणेश विसर्जन सोहळ्यात सर्वोच्च न्यायालयाने ध्वनीप्रदुषणाबाबत दिलेल्या नियमावलीचे उल्लंघन केल्याप्रकरणी शहरातील २०० हून अधिक मंडळांना पोलिसांनी नोटीस बजावली आहे. ध्वनी प्रदुषणाबाबतचा अहवाल पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी मंडळांना नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे.

विसर्जन सोहळ्यात ध्वनीमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांना पोलिसांनी नोटिसा बजावल्या आहेत. 'ध्वनीप्रदूषण मर्यादा भंग केल्याप्रकरणी पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम १५ अन्वये पाच वर्षांपर्यंत कैद आणि एक लाख रुपये दंड अशी तरतूद आहे. त्यामुळे या शिक्षेस पात्र ठरणारा गुन्हा का दाखल करू नये, याबाबत मंडळांनी कारणे दाखवा नोटीस मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे', असे नोटिशीत म्हटले आहे.

'मंडळांच्या पदाधिकाऱ्यांचे लेखी म्हणणे, परवानगी पत्र, तसेच विसर्जन सोहळ्यात ध्वनीवर्धक यंत्रणा उपलब्ध करुन देणाऱ्या व्यावसायिकाचे नाव, पत्ता, मोबाइल क्रमांक, मिरवणूक परवाना अशा कागदपत्रांसह संबंधित परिमंडळाच्या पोलिस उपायुक्त कार्यालयात उपस्थित रहावे. मंडळाचे पदाधिकारी हजर न राहिल्यास संबंधित मंडळाचे म्हणणे नसल्याचे समजून महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३६ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम १५ नुसार थेट गुन्हा दाखल केला जाईल', असे नोटिशीत स्पष्ट करण्यात आले आहे.

अजित पवारांचा राजीनामा घ्या, नाही तर दिल्ली गाठणार

अंजली दमानिया यांचा सरकारला अल्टिमेटम; अमित शहांना भेटण्याचा दमानियांचा इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६मुंबई

पुण्यातील वादग्रस्त जमिनीच्या व्यवहारावरून राज्याच्या राजकारणात मोठा गदारोळ निर्माण झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पूत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन या व्यवहारातील तथाकथित गैरव्यवहार उघड केला. दमानिया यांनी सांगितलेल्या तपशीलानुसार, पुण्यातील ४० एकर सरकारी जमिनीसंदर्भात अमेडिया कंपनीने डेटा सेंटर सुरू करणार असल्याचे खोटे दाखवून फक्त ५०० रुपयांत स्टॅम्प ड्युटी माफी मिळवली, असा आरोप त्यांनी केला. त्यावरून त्यांनी अजित पवार यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली आहे.

अंजली दमानिया यांनी ठामपणे सांगितले की, अमेडिया कंपनीकडून सबमिट केलेल्या लीज डीड आणि कागदपत्रांमध्ये डेटा मायनिंग, आयटी सेवा व सायबर सुरक्षा प्रकल्प उभारण्याचा उल्लेख आहे. यामध्ये ९८ लाखांची गुंतवणूक असल्याचेही नमूद करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात हा व्यवहार जमीन विकत घेण्यासाठीचा असल्याचा संशय आहे. बाजारमूल्य शेकडो कोटी असलेल्या जमिनीवर फक्त ५०० रुपयांत व्यवहार करण्याचे कट कारस्थान असल्याचा आरोप त्यांनी केला. एवढे मोठे प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांनी पुण्याचे पालकमंत्री असलेल्या अजित पवारांना न सांगता झाले, हे कसे? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

अंजली दमानिया यांनी राज्य सरकारला चव्हाट्यावर आणले आहे. त्यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात तातडीने कारवाई करावी आणि अजित पवारांचा उपमुख्यमंत्री व पालकमंत्री पदाचा राजीनामा त्वरित घ्यावा. राजीनामा घेतला नाही तर मी सर्व पुरावे घेऊन अमित शहा यांची भेट घेईन, असा थेट इशारा दमानिया यांनी दिला. तसेच या प्रकरणात नेमलेल्या एसआयटीवरही अविश्वास व्यक्त करून, त्या समितीला बरखास्त करण्याची मागणी त्यांनी पुढे केली. तपास पथकात जिल्ह्याचे अधिकारी मोठ्या प्रमाणात असणे हा तपासावर परिणाम करू शकतो, असे त्या म्हणाल्या.

फुटाणे विक्रीच्या वादातून तरुणाची हत्या

बडनेरा जुनवस्तीत सावता मैदानात धक्कादायक घटना

विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ बडनेरा

बडनेरा जुनवस्तीतील सावता मैदानात फुटाणे विक्रीच्या वादातून एका तरुणाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ऋषी राजू खापेकर (२७) असे मृत तरुणाचे नाव असून त्याची सपासप चाकूने हत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात शेख तौफीक शेख शकूर (२१) याच्यासह तीन नाबालिगांचा समावेश असून या तिघांची वये अनुक्रमे १३, १४ आणि १५ वर्षे असल्याची माहिती समोर आली आहे. मृतक ऋषी खापेकर आणि चारों आरोपी हे रेल्वेगाड्यांमध्ये चणे-फुटाणे विक्रीचे काम करीत होते. या व्यवसायात ग्राहक आणि विक्रीच्या जागेवरून त्यांच्यात गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू होता.

गेल्या रात्री सावता मैदानात आरोपींनी ऋषीला घेरले. सुरुवातीला झालेल्या शिवीगाळ आणि मारहाणीनंतर आरोपींनी त्याच्यावर चाकूने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत ऋषीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत चारही आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.या हत्याकांडामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अल्पवयीन मुलांच्या गुन्हेगारीकडे वाढत्या कलाबद्दल चिंतेची भावना व्यक्त होत आहे.

संपादकीय .....

सिनेमातला 'यमला जट'!

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय चित्रपटसृष्टीवर पहिली काही वर्षे दिलीपकुमार, देव आनंद आणि राज कपूर यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. १९६० चे दशक शम्मी कपूरने, सत्तरच्या दशकाच्या आगेमागे सुपस्टार राजेश खन्ना आणि त्यानंतर अमिताभ बच्चनने लाखो तरुण-तरुणींची मने जिंकली. परंतु मुख्यतः दिलीपकुमारच्या प्रेमात असलेल्या धर्मेंद्रने १९६० साली हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करून, किमान ३५ वर्षे नायक म्हणून लोकांच्या हृदयात स्थान मिळवले आणि त्यानंतरही चरित्र अभिनेता म्हणून तो टिकून राहिला.

देखणेपणाच्या बाबतीत देव आनंदनंतर धर्मेंद्रचाच क्रमांक लागतो. १९५०-६०च्या दशकांत स्टंटपट किंवा सी ग्रेड चित्रपट मोठ्या संख्येत बनत आणि त्यामध्ये दारासिंग, रंधवा यासारखे पैलवान नट काम करत. परंतु मुख्य धारेतील चित्रपटसृष्टीत धर्मेंद्रसारखी शरीरसंपदा असलेला नट झाला नाही. पंजाबमधील गावखेड्यात वाढलेल्या धर्मेंद्रच्या व्यक्तिमत्त्वात एक गावरान रगेलपणा होता. पंजाबी जाट कुटुंबात जन्म असल्यामुळे धर्मेंद्र परंपरावादी होता. दिलीपकुमारचे चित्रपट बघून तो अत्यंत प्रभावित झाला. फिल्मफेअरच्या एका स्पर्धेत भाग घेण्यासाठी मुंबईत आला. त्यात निवड झाल्यानंतरही त्याला सुरुवातीला काम मिळाले नाही. त्यामुळे तो पंजाबला परतला.

निर्माता सुबोध मुखर्जी यांनी त्याला पुन्हा मुंबईला बोलावून घेतले. मात्र त्यांच्या 'लव्ह इन सिमला' या चित्रपटाचा दिग्दर्शक आर. के. नय्यर यांनी आम्हाला नायक हवा आहे, फुटबॉलपटू नव्हे, असे म्हणून त्याला परत पाठवले. त्यानंतर स्टुडिओच्या चकरा मारण्यात काही काळ गेल्यावर धर्मेंद्रला 'दिल भी तेरा हम भी तेरे' हा चित्रपट मिळाला. सुरुवातीच्या काही चित्रपटांत त्याने दुय्यम वा नकारात्मक भूमिकादेखील केल्या. शम्मी कपूरच्या 'बॉयफ्रेंड' या चित्रपटातला पोरगेलासा धर्मेंद्र ओळखूदेखील येत नाही. 'आयी मिलन की बेला' या चित्रपटाचा नायक राजेंद्रकुमार होता आणि धर्मेंद्र त्यात खलनायक होता. 'फूल और पत्थर' या चित्रपटातील शाका या गुंडाच्या भूमिकेत धर्मेंद्रने प्रथमच आपली ओळख निर्माण केली.

'आयी मिलन की बेला', 'आये दिन बहार के', 'मेरा गाँव मेरा देश', 'शिकार' आणि 'समाधी' या चित्रपटांमध्ये धर्मेंद्रची आशा पारेखबरोबर जोडी जमली. 'लोफर', 'दो चोर', 'राजा जानी', 'कहानी किस्मत की' अशा अनेक चित्रपटांतून त्याने शहरी, चलाख नायकाच्या भूमिका केल्या. 'प्रतिज्ञा' या चित्रपटात धर्मेंद्र हा अशिक्षित ट्रक ड्रायव्हर असतो आणि परिस्थितीमुळे त्याला इन्स्पेक्टरच्या भूमिकेत जावे लागते.

या सिनेमात धर्मेंद्रने हास्य अभिनयाची आपली अनोखी अदा पेश करून तुफान लोकप्रियता संपादन केली. त्यातील 'मैं जट यमला पगला दीवाना' या गाण्यातील धर्मेंद्रचा डान्स इतका लोकप्रिय झाला होता की, एका रिॲलिटी शोमध्ये हेमा मालिनीनेही त्याची नक्कल करून दाखवली होती.

'तुम हसीं मैं जवाँ' या चित्रपटापासून हेमा मालिनी आणि धर्मेंद्र यांनी जवळपास तीसेक चित्रपटांतून नायक-नायिका म्हणून काम केले. राज कपूर - नर्गिस या जोडीप्रमाणेच प्रेक्षकांची पडद्यावरील ही मनपसंत जोडी होती. धर्मेंद्रने हेमाबरोबर विवाह केला आणि तो कधी लपवूनही ठेवला नाही. हे दोघे पुढे राजकारणातही आले. 'हकीकत' हा युद्धपट किंवा 'धरमवीर', 'रझिया सुलतान', 'सल्तनत' यांसारख्या पोशाखीपटांत आपल्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वामुळे धर्मेंद्र शोभून दिसला.

धर्मेंद्रला अभिनेता म्हणून खरे व्यक्तिमत्त्व बहाल करून दिले, ते बिमल रॉय आणि हृषीकेश मुखर्जी यांनी. 'बंदिनी', 'अनुपमा', 'सत्यकाम', 'गुड्डी', 'चैताली', 'चुपके चुपके' या चित्रपटांमधील धर्मेंद्रचा अभिनय अत्यंत सहज आणि उत्स्फूर्त आहे. या चित्रपटांतील धर्मेंद्रच्या व्यक्तिरेखा वैशिष्ट्यपूर्ण आणि ठसठशीत आहेत. अभिनय कशाशी खातात, याची कल्पनाही नसलेला धर्मेंद्र बिमलदा आणि हृषीदांच्या चित्रपटांत मनाला अधिक स्पर्श करून जातो. 'गुड्डी'मध्ये धर्मेंद्रने धर्मेंद्रचीच भूमिका केली होती आणि त्यात आजकाल राजेश खन्नाचा जमाना सुरू झाला आहे, असा संवादही त्याच्या तोंडी आहे!

'शोले', 'राम बलराम', 'चुपके चुपके' या चित्रपटांमध्ये धर्मेंद्र आणि अमिताभने कमालीचा आणि धमालीचा अभिनय केला आहे. 'शोले'साठी अमिताभचे नाव धर्मेंद्रनेच सुचवले होते. राजेंद्रसिंग बेदी यांच्या 'फागुन' या चित्रपटात वहिदा रेहमानसारख्या कसलेल्या अभिनेत्रीसह काम करताना धर्मेंद्र कुठेही कमी पडला नाही.

मल्टिस्टारर चित्रपटांचा जमाना सुरू झाल्यावर धर्मेंद्रने अशा चित्रपटांतही स्वतःची एक जागा निर्माण केली. लेखक, सैनिक, पोलिस ऑफिसर, शेतकरी, इंजिनिअर, कैदी अशा कोणत्याही भूमिकेत धर्मेंद्र शोभून दिसायचा. अभिनयाचे कोणतेही शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले नसूनही त्याने आपण एक बर्या दर्जाचा अभिनेता आहोत, हे सिद्ध करून दाखवले. राजेंद्रकुमार, मनोजकुमार, विश्वजित, जॉय मुखर्जी यांसारखे अनेक नट फार वर्षे टिकले नाहीत. परंतु धर्मेंद्र कैक वर्षे नायक म्हणून आणि नंतर चरित्र अभिनेता म्हणून टिकून राहिला.

धर्मेंद्रने आपल्या मुलांसाठी का होईना, पण चित्रपटनिर्मिती सुरू केली आणि सनी देओल वा बॉबी देओल हे नायक म्हणून पुढे प्रस्थापित झाले. 'लाईफ इन अ मेट्रो', 'जॉनी गद्दार', 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' हे गेल्या काही वर्षांतील धर्मेंद्रचे गाजलेले चित्रपट. 'यमला पगला दीवाना' या चित्रपटाचे तीन भाग त्याने सादर केले.अत्यंत खुल्या व मोकळ्या मनाने आणि दिलदारपणे कसे वागावे आणि जगावे, हे धर्मेंद्रकडे पाहून समजते. पंजाबच्या या यमला जटाला जिवंतपणी माध्यमांनी मारलेदेखील होते. परंतु शेवटी प्रत्येक जन्माची अखेर ही होतच असते. बाहेरून पोलादी असलेला धर्मेंद्र आतून हळवा होता. धर्मेंद्रच्या जाण्यामुळे एका जिंदादिल जीवनाची अखेर झाली आहे.

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात होणार प्राणी संग्रहालय

वनमंत्री गणेश नाईक यांची वन अधिकाऱ्यांसोबत बैठक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ नागपूर

राज्यात मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. विदर्भाच्या ग्रामीण भागात वाघाचे आणि पश्चिम महाराष्ट्रात बिबट्याचे हल्ले वाढले आहेत. या हल्ल्यात गावकऱ्यांच्या मृत्यूचे प्रमाणही वाढले आहे. अशा परिस्थितीत संभाव्य मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी वन्यप्राण्यांना रेस्क्यू केल्यामुळे उपचार केंद्रातही त्यांची संख्या वाढली आहे. त्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्ह्यात प्राणी संग्रहालयाची निर्मिती करण्याचा विचार सुरू आहे, अशी माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली.

सोमवारी वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समीक्षा बैठकीनंतर वनमंत्री गणेश नाईक यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, बिबट्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी मादी बिबट्यांची शस्त्रक्रिया करण्यावर काम करण्यात येत आहे. याबाबत तीन महिन्यांत अहवाल पुढे येणार आहे. वन विभागाच्या जमिनीवर प्राणी संग्रहालयाची निर्मिती करण्यात येईल. गोरेवाडा बचाव केंद्राची वन्यप्राणी ठेवण्याची मर्यादा संपली आहे. विदर्भात कोणत्याही भागात वन्यप्राण्याला पकडल्यानंतर गोरेवाडा केंद्रात ठेवण्यात येते. या पार्श्वभूमीवर गुजरात, छत्तीसगड, मेघालय आणि महाराष्ट्राच्या संजय गांधी

उद्यानाकडून आठ वाघ आणि आठ बिबट्यांची मागणी करण्यात येत आहे.

याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला आहे. परंतु, त्याला अद्यापपर्यंत मान्यता मिळालेली नाही. मानव-वन्यजीव संघर्षामुळे बंदिस्त केलेल्या वन्य प्राण्यांची संख्या वाढत आहे. अशा स्थितीत या वन्य प्राण्यांना कोठे ठेवणार याबाबत वन विभागाची चिंता वाढली आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्राणी संग्रहालय स्थापन करण्याचा विचार सुरू आहे. तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्यकाळात बिबट्याच्या सफारीचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. या प्रस्तावाला गती देण्याचे आश्वासन वनमंत्र्यांनी दिले.

यावेळी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वन बल प्रमुख एम. श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. एस. रेड्डी, संजीव गौड, विवेक खांडेकर, ऋषिकेश रंजन, डॉ. प्रवीण चव्हाण, वनविकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नरेश झुरमुरे, पी. कल्याणकुमार, एस. व्ही रामाराव, आदी अधिकारी उपस्थित होते.

ट्रांझीट ट्रीटमेंट सेंटरच्या वाहनांच्या दुरुस्तीसाठी आणि वेतनासाठी उशीर होत असल्याबाबत ते म्हणाले, वन विभागाची वाहने एआय सिस्टीमला जोडली आहेत. ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला लागून असलेल्या जमिनीजवळ वन विभागाच्या जमिनीवर बांबू लावून ५०० फुटांची भिंत तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यासोबतच प्रत्येक वन परिक्षेत्रात कमीतकमी १०० हेक्टर सागवान झाडांचे रोपण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आतड्यांच्या आरोग्यासाठी 'ही' चार फळे सर्वोत्तम!

दि.२६विदर्भ प्रजासत्ताक

सध्याच्या धावपळीच्या जीवनात लोक आपल्या आरोग्याकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नाहीत. यामुळे मधुमेह, लठ्ठपणा आणि हृदयविकार यांसारख्या अनेक रोगांचा धोका वाढला आहे. याचबरोबर, कर्करोगासारखा जीवघेणा आजारही लोकांना वेगाने ग्रासत आहे.

आपण जे काही खातो, त्याचा थेट परिणाम आपल्या पचनसंस्था आणि त्यातील चांगल्या बॅक्टेरियावर होतो. त्यामुळे आपल्या आहारात आरोग्यदायी फळांचा समावेश करणे आवश्यक आहे. आहारतज्ज्ञांच्या मते आतड्यांसाठी काही फळे अतिशय फायदेशीर आहेत.

किवी

किवीमध्ये एक्टिनिडिन नावाचे एन्झाइम आढळते. हे प्रथिने तोडून पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर करते. यातील ॲंटिऑक्सिडंट्स आणि प्रीबायोटिक्स आतड्यांना मजबूत करतात. किवीचे सेवन केल्याने सूज आणि कोलन कर्करोगाचा धोका कमी होतो.

लिंबूवर्गीय फळे

लिंबू, संत्री आणि ग्रेपफ्रूट यांसारखी लिंबूवर्गीय फळे शरीरासाठी नैसर्गिक डिटॉक्सिफायर म्हणून काम करतात. यात व्हिटॅमिन सी व फ्लेवोनॉइड्स चांगल्या प्रमाणात असतात. हे घटक शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ नष्ट करतात आणि पेशींना नुकसान होण्यापासून वाचवतात.

सफरचंद

सफरचंदातील पेक्टिन फायबर गट बॅक्टेरियासाठी खूप फायदेशीर असते. हे फायबर आतड्यांमध्ये तुटते, तेव्हा ब्युटीरेट नावाचे फॅटी ॲसिड तयार होते. जे कर्करोगाच्या पेशींपासून बचाव करते. सफरचंदाच्या सालामध्ये क्वेरसेटिन नावाचा एक शक्तिशाली ॲंटिऑक्सिडंट असतो.

कलिंगड

कलिंगडामध्ये ९० टक्के पाणी असते, जे शरीराला हायड्रेटेड ठेवते आणि पचनक्रिया दुरुस्त ठेवते. यात असलेले लायकोपीन हे ॲंटिऑक्सिडंट कर्करोगापासून बचाव करण्यास मदत करते. तसेच, ते कोलनसह इतर अनेक कर्करोगांचा धोका कमी करते.

आरक्षणाची मर्यादा ओलांडली तर निवडणूक रद्दही होऊ शकते

निवडणुकांवरील टांगती तलवार कायम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६नवी दिल्ली- राज्यघटनेने दिलेल्या ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घेतली गेली तर ती पुढे चालून रद्द सुद्धा केली जावू शकते, असा स्पष्ट इशारा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला. महाराष्ट्रातील ५७ स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांमध्ये ही मर्यादा ओलांडली गेल्याने, त्या निवडणुकांचे अंतिम निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या आगामी निर्णयावर अवलंबून राहतील, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

ओबीसी समुदायाला संपूर्ण बाहेर करून लोकशाही चालू शकत नाही. परंतु, जातीच्या नावावर समाजाचे विभाजनही व्हायला नको, असे विधान सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी केले. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील आरक्षणाच्या याचिकेवर आता पुढील शुक्रवारी सुनावणी होईल. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठापुढे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षणाशी संबधित याचिकेवर सुनावणी झाली. येत्या शुक्रवारी निर्देश दिले जातील, असे न्यायालयाने स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मर्यादेच्या पलीकडे जावून आरक्षण दिले जात असल्याचा आरोप करणारी याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले आहे की, निवडणुका निश्चित आरक्षणानुसारच व्हायला हव्यात. ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली तर निवडणूक रद्दही केली जावू शकते.

कोणती प्रक्रिया सुरू आहे?

सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी कोणकोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली, असे विचारले असता राज्य शासनाने २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पालिकांची प्रक्रिया सुरू झाल्याचे सांगितले. मात्र, महानगर पालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली नाही, असेही सांगितले.

न्यायालयाच्या आदेशानुसार आता सर्व काही व्हायला हवे

अधिवक्ता इंदिरा जयसिंग यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडत सांगितले की, आरक्षणाची ५०%ची मर्यादा ओलांडली जावू शकत नाही, असे पीठाने स्पष्ट केले आहे. तरीही सरकारने वेळ मागितली आहे. यावर सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले की, सध्या जे काही होत आहे ते कोर्टाच्या आदेशानुसारच व्हायला हवे. इंदिरा जयसिंग म्हणाल्या की, आरक्षणाची मर्यादा ५० टक्के निश्चित करण्यात आली आहे. परंतु, महाराष्ट्राच्या ज्या भागात निवडणुका होत आहे तेथे एससी-एसटीची लोकसंख्या जास्त असल्यामुळे ५० टक्के आरक्षण त्यांच्यातच संपून जाते. अशात, ओबीसीला काहीही मिळणार नाही. आपण प्रमाणानुसार प्रतिनिधीत्वाची मागणी करीत आहेत. बांठिया आयोगाच्या पूर्वीच्या स्थितीप्रमाणे निवडणुका घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. हे निर्देश ५० टक्क्याची मर्यादा ओलांडण्याची परवानगी नव्हती. राज्याच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या निर्देशाचा चुकीचा अर्थ काढला होता, असे न्यायालयाने मागील सुनावणीच्यावेळी म्हटले होते.

पुढील सुनावणीच्या वेळी राज्य आणि केंद्राने आरक्षणाची आकडेवारी, कायद्याची स्थिती आणि लोकसंख्यानिहाय प्रतिनिधीत्वाच्या संपूर्ण आकडेवारीसह उपस्थित रहावे, असेही न्यायालयने सांगितले आहे.

राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत ३ खेळाडूंची निवड

१४, १७ वर्षे गटात यश, शिबिरासाठी होणार रवाना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

अमरावती महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने २७ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल बारामती येथे आयोजित राज्यस्तरीय सॉफ टेनिस स्पर्धेसाठी अमरावतीच्या तीन खेळाडूंची निवड झाली आहे. सॉफ्ट टेनिस असोसिएशन ऑफ अमरावती व डीएस अकादमी विभागीय क्रीडा संकुल, जवाहर नेहरू स्टेडियम अमरावती येथे हे तिन्ही खेळाडू नियमित सराव करतात. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात मनस्वी प्रशांत गेडाम (एसडीएफ इंग्लिश स्कूल),१७ वर्षांखालील मुलींच्या गटात अनघा विनोद निहातकर (श्री साईबाबा विद्यालय साईनगर) व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात वेदांत रवींद्र दांडगे (श्री शिवाजी विज्ञान महा.) यांची निवड झाली आहे. या तिन्ही खेळाडूंचे सराव शिबिर ५ ते २५ नोव्हेंबरपर्यंत विभागीय क्रीडा संकुलातील टेनिस कोर्टवर सुरू असून २६ नोव्हेंबर रोजी ते पुण्याकडे रवाना होणार आहेत. हे खेळाडू प्रशिक्षक व जिल्हा सॉफ्ट टेनिस संघटनेचे सचिव नितीन पोटे, प्रशिक्षक श्रीकांत यावले यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात.

कमी कालावधीमध्ये सशक्त व निरोगी भाजीपाला रोपे तयार करायचीत? करा 'या' तंत्राचा वापर

दि.२६विदर्भ प्रजासत्ताक

प्रो ट्रे रोपवाटिकेमध्ये कमी जागेत जास्त आणि समान रोपे तयार होतात. कोकोपीट, व्हर्मी कंपोस्टचा वापर करून मातीशिवाय रोपे तयार होतात, अधिक सशक्त रोपे तयार होतात. शेडनेटचा वापर केल्यास उन्हाळी रोपे तयार करता येतात.

प्लास्टिक प्रो ट्रे म्हणजे काय?

प्लास्टिक प्रो ट्रे हा एक विशेष प्रकारचा ट्रे असतो, ज्यामध्ये वेगवेगळ्या आकाराचे (उदा. ५०, ९८, १०४, १२८, २०० सेल्स) कप्पे असतात. प्रत्येक कप्प्यात एक बी टाकले जाते, ज्यामुळे प्रत्येक रोप स्वतंत्र वाढते.

प्रो ट्रेचा वापर करण्याचे फायदे

जास्त उगवणक्षमता

ट्रेमध्ये उबदार वातावरण आणि नियंत्रित पाणी/अन्न मिळाल्याने उगवणीची टक्केवारी ९०% पेक्षा अधिक होते.

मुळे मजबूत आणि निरोगी

प्रत्येक रोपाला स्वतंत्र जागा मिळते, त्यामुळे मुळे गुंतत नाहीत. रोपांची लागवड करताना मुळांना धक्का लागत नाही.

कीड आणि रोगांचे नियंत्रण

मातीचा संपर्क कमी असल्याने डॅम्पिंग-ऑफ सारखे रोग टाळता येतात. जैविक नियंत्रण वापरणे सोपे होते.

कमीत कमी बियाण्यांचा वापर

प्रत्येक ट्रे मध्ये एकच बी टाकले जाते, त्यामुळे बियाण्यांची नासाडी टळते.

एकसारखी रोपे

रोपे सारख्या उंचीची, ताकदवान आणि लावणीसाठी तयार असतात.

सुलभ वाहतूक आणि व्यवस्थापन

ट्रे हलके असतात. रोपे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी सहज नेऊ शकतात.

प्रो ट्रेमध्ये रोपांचे व्यवस्थापन

१) प्रो ट्रे ची निवड

टोमॅटो, मिरची, कोबी, वांगीसाठी ९८ किंवा १०४ सेल्सचा ट्रे वापरावा. कोथिंबीर, मेथीसाठी १२८ किंवा त्याहून अधिक सेल्सचा ट्रे वापरावा.

२) माध्यम भरणे

कोकोपीट + गांडूळ खत + ट्रायकोडर्मा या मिश्रणाने ट्रे भरावा. माती वापरू नये. माध्यम निर्जंतुकीकरण केलेले असावे.

३) बीज पेरणी

प्रत्येक सेलमध्ये १ बी ठेवावे आणि थोडेसे माध्यम टाकून झाकावे.

४) पाणी देणे

हलक्या हाताने स्प्रे किंवा ड्रिपने पाणी द्यावे. ट्रे अर्ध सावलीत ठेवा. शेडनेटचा वापर करा.

५) खत व जैविक नियंत्रण

ट्रायकोडर्मा, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क यांचे स्प्रे करावेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

महिला खर्रा खाणाऱ्या म्हणणाऱ्या दोडक्या भावाला धडा शिकवा

चित्राताई वाघ यांचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२५धामणगाव रेल्वे

धामणगावच्या विकासात कोणताही हातभार नाही केवळ आरोप करणे हाच धंदा असलेल्या व महिला खर्रा खातात म्हणणाऱ्या दोडक्या भावाला या निवडणुकीत धडा शिकवा असे आवाहन भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांनी केले.धामणगाव नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या भाजपाच्या उमेदवार अर्चनाताई अडसड रोठे व नगरसेवक पदासाठी रिंगणात असलेल्या भाजपाच्या वीस उमेदवारांच्या प्रचारार्थ वाघ आज आल्या होत्याआरोही रिसॉर्ट येथे आयोजित भाजपा महिला मेळाव्याला संबोधित करताना त्या म्हणाल्या की देशाचे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांसाठी बालपणापासून तर संपूर्ण आयुष्यासाठी विविध योजना आणल्या त्या योजनेचा लाभ सर्वसामान्य महिलांना मिळत असताना काही दोडके भाऊ महिलांच्या विरोधात बोलतात या दोडक्या भावाला या निवडणुकीत धडा शिकवा असा अप्रत्यक्ष टोला त्यानी माजी आ विरेंद्र जगताप यांना

धामणगावात भाजपा महिला आघाडी मेळावा

मारला

आक्का नव्हे तर ही दुर्गा!

.धामणगाव शहराच्या विकासात भाजपाचे मोठे योगदान आहे अर्चनाताई अडसड उर्फ आक्का यांच्या कडे शहर विकासाचे व्हिजन आहे महिला संघटन शक्तीचा मोठा अनुभव आहे मी आक्का ऐवजी त्यांना दुर्गा नावानेच बोलविते शहरात स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, महिलांसाठी सुरक्षितता अशा अनेक मूलभूत समस्यांवर निर्भीडपणे काम करून महत्त्वाकांक्षी योजना अर्चनाताई अडसड राबविण्याचा त्यांचा निर्धार आहे त्यामुळे त्यांना व भाजपाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन चित्राताई वाघ यांनी केले. गत पंधरा वर्षात या शहराचा विकास सर्वाधिक झाला शहरातील महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ३ कोटीची सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची ई प्रक्रिया पूर्ण झाली आहे शास्त्री चौक ते अजनसिंगी सह चार रस्त्यासाठी ५० कोटी चा निधी मंजूर आहे गटार योजना मंजूर होताच या कामाला सुरूवात होणार आहे आता विरोधाकडे बोलण्यास कोणताही ठोस मुद्दा नसल्याने ते निराधार आरोप करीत असल्याचे आमदार प्रतापदादा अडसड आपल्या भाषणात म्हणालेशहरात महिलांच्या रोजगारासाठी क्लस्टर उभारणे तसेच विविध उपक्रम राबविणार असल्याचे अर्चनाताई अडसड यांनी सांगितले अरुणभाऊ ची लेक बटन नंबर एक असा नारा उपस्थित महिलांनी दिला यावेळी भाजपाचे पदाधिकारी तसेच वीसही उमेदवार यांची मंचावर उपस्थित होती.

आरक्षण मर्यादा वाद पुन्हा पेटला

तीन स्थानिक स्वराज्य निवडणुका धोक्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती- मतदारसंघांचे आरक्षण निश्चित करताना एकूण आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक असू नये, असा कायदा आहे. सर्वोच्च न्यायालयानेही तसेच निर्देश दिले आहेत. परंतु तरीही प्रभागांचे आरक्षण निश्चित करताना काटेकोर काळजी न बाळगल्याने जिल्ह्यातील चिखलदरा व दर्यापुर या दोन नगरपालिका आणि धारणी या नगरपंचायतीमध्ये एकूण आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक झाले आहे. त्यामुळे तेथील निवडणुकांवर अनिश्चिततेचे सावट ओढवले आहे.

यासंदर्भात आज, मंगळवार, २५ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी होणार होती. परंतु ही सुनावणी पुन्हा एकदा दोन दिवस पुढे ढकलण्यात आली असून २७ नोव्हेंबर ही नवी तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे या तिन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे भवितव्य टांगणीला लागले असून मतदानापूर्वीच तेथील निवडणूक रद्द होणार की निकाल रोखून धरायला लावले जाणार, याबद्दल विधीतज्ज्ञांद्वारे वेगवेगळे तर्क व्यक्त केले जात आहेत. काहींच्या मते सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या निकालाच्या अधीन राहून या तिन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला अभय मिळू शकते.स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कोणते प्रभाग कोणत्या संवर्गासाठी आरक्षित केले जावे, यासाठी प्रत्येक नगरपालिका व नगरपंचायतींसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांच्या देखरेखीत आणि राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसह सामान्य नागरिकांच्या उपस्थितीत ठिकठिकाणी सोडत काढण्यात आली.जिल्ह्यातील १० नगरपालिका आणि दोन नगरपंचायती अशा डझनभर ठिकाणी एकाच दिवशी ही सोडत काढण्यात आली. परंतु तरीही चिखलदरा येथील एकूण आरक्षण ७५ टक्क्यांवर पोहोचले असून दर्यापुर नगरपालिकेचे एकूण आरक्षण ५२ टक्क्यांवर थांबले आहे. त्याचवेळी धारणी नगरपंचायतीचे आरक्षण ६५ टक्के झाले असून तिन्ही ठिकाणची संख्या ही ५० टक्क्यांहून अधिक असल्याने तेथील निवडणूक साशंक बनली आहे.

जिल्हा परिषदेबाबतही अडचण

जिल्ह्यातील १२ पैकी दोन नगरपालिका आणि एका नगरपंचायतीबद्दल ही अडचण असतानाच जिल्हा परिषदेतही तसेच झाले आहे. जिल्हा परिषदेतील वेगवेगळ्या संवर्गांचे आरक्षण ६४ टक्क्यांवर पोहोचले आहे. ही संख्या ५० टक्क्यांहून अधिक असल्याने ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण असू नये, या कायद्याचा तेथेही भंग झाला आहे. त्यामुळे येत्या काळात जिल्हा परिषदेच्या निवडणुकांबाबतही अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे उद्या २७ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालय काय सांगते, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

ये देवेंद्र...!:फडणवीसांना अंगाखांद्यावर खेळवलेली महिला जेव्हा भरसभेत हाक मारते!

नेते-अधिकारी स्तब्ध, मेळघाटातील क्षण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ मेळघाट- सभेची धामधूम, कार्यकर्त्यांची गर्दी आणि पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त... अशा वातावरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ताफा परतण्यासाठी निघाला होता. तेवढ्यात गर्दीतून एका महिलेचा आवाज आला, देवेंद्र...! राज्याच्या प्रमुखाला थेट एकेरी नावाने मारलेली ही हाक ऐकून उपस्थित अधिकारी आणि सुरक्षा रक्षक क्षणभर अवाक झाले. पण खुद्द मुख्यमंत्र्यांनी ती हाक ऐकली, मागे वळून पाहिले आणि त्या महिलेची आत्मीयतेने भेट घेतली.

नगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने मेळघाटातील धारणी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभा आज पार पडली. प्रचारसभा आटोपून मुख्यमंत्री निघाले असताना एका महिलेने अरे देवेंद्र अशी हाक मारली. दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांना देवेंद्र म्हणून हाक दिल्याने सगळे अधिकारी, कर्मचारी, सोबकचे नेतेही एकमेकांकडे पाहू लागले.मुख्यमंत्री फडणवीस यांनीही तत्काळ मागे वळून पाहिले.त्या महिलेने मुख्यमंत्र्यांचे शाल आणि श्रीफळ देऊन स्वागत केले आणि त्यांचा हात हातात घेऊन आपुलकीने विचारपूस केली.

त्याला अंगाखांद्यावर खेळवलंय, म्हणूनच तो आला मुख्यमंत्र्यांशी झालेल्या भेटीनंतर या महिलेने जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या, माझं माहेर आणि देवेंद्र यांचं मूळ गाव चंद्रपूर जिल्ह्यातील मूल गाव हे एकच आहे. त्यांच्या बहिणी माझ्यासोबत एकाच वर्गात होत्या. आमचे जुने कौटुंबिक संबंध आहेत. देवेंद्र लहान असताना मी त्याला अंगाखांद्यावर खेळवलं आहे. आज इतक्या वर्षांनी भेट झाली, पण जुन्या ओळखीमुळेच मी त्याला हक्काने आवाज दिला आणि तोही लगोलग माझ्याकडे आला. नाहीतर तो आला नसता.

हक्काने मांडल्या मेळघाटातील व्यथा

महिला म्हणाली, मी एक सर्वसाधारण सामाजिक कार्यकर्ती आहे. मला माझ्यासाठी काही नको, पण आमच्या मेळघाटात रस्ते, नाले आणि पाण्याची भीषण समस्या आहे. लोकांचे हाल होत आहेत, अशी कैफियत त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली.

यावर मुख्यमंत्र्यांनीही, तुम्ही सांगितलेल्या समस्यांची मी नोंद घेतली आहे. रस्ता आणि पाण्याचे प्रश्न मी तत्काळ मार्गी लावतो, असा ठाम शब्द आपल्या या 'लाडक्या बहिणी'ला दिला. राजकारणाच्या धकाधकीतही बालपणीच्या आठवणी आणि माणुसकीचा हा ओलावा धारणीत उपस्थितांच्या मनाला भावला.

सुरक्षारक्षकांचा रोखण्याचा प्रयत्न, मुख्यमंत्र्यांनी थांबवले

दरम्यान, सदरील महिला मुख्यमंत्र्यांचा हात घेऊन त्यांची चौकशी करीत होती. बालपणीच्या आठवणी सांगत होती. यादरम्यान मुख्यमंत्र्यांच्या अवतीभवती असलेल्या सुरक्षारक्षकांनी महिलेचा हात मागे सारण्याचा प्रयत्न केला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना रोखले. बोलू द्या असा हातानेच इशारा करून सांगितले.

२९-३० ला चंद्र निरीक्षणाची दुर्मीळ संधी : मराठी विज्ञान परिषदेचा उपक्रम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती- टेलिस्कोप (दुर्बिणीतून) मधून चंद्रावरील विवरे पाहण्याची शहरातील खगोलप्रेमींना संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार चंद्रावरील हालचाली अमरावतीकरांना बघता येईल. आगामी शनिवार २९ ते ३० नोव्हेंबर यादरम्यान मराठी विज्ञान परिषदेच्या वतीने हा उपक्रम प्रेमींसाठी राबवण्यात आला आहे. या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विजय गिरडकर यांनी केले आहे.

ज्या पृथ्वीवर आपण राहतो ती अवकाशात एकलकोंडी नाही. तिला एका छोटा मित्राचा सहवास आहे. तो मित्र म्हणजे चंद्र पृथ्वीपासून चंद्राचे अंतर ३,८४,४०२ कि.मी. आहे. व्यास ३.४७३ कि.मी. चंद्रापासून निघालेले प्रकाशकिरण पृथ्वीवर येण्यास १.३ सेकंद लागतात. चंद्राला स्वतःचा प्रकाश नाही. त्याला सूर्यापासून प्रकाश मिळतो. दुर्बिनीतून चंद्राचे निरीक्षण केले असता भेगा, शलाका, विवरे यांचे दर्शन अगदी स्पष्टपणे घडते. चंद्रावर वातावरण नसल्याने

चंद्रावरील अनेक बारकावे दृष्टीस पडतात. चंद्रावर एकूण ३० हजार विवरे व १२ पर्वत आहेत. सर्वात मोठ्या विवराचे नाव न्यूटन विवर' आहे. सर्वात मोठ्या पर्वताचे नाव लिबनीट्स' हे आहे. चंद्रबिंबाच्या दक्षिण गोलार्धात विवरांची संख्या मोठी आहे. चंद्रावर वातावरण नसल्याने त्यावर पडणाऱ्या उल्का जळून न जाता चंद्राच्या पृष्ठभागावर आदळून हे विवरे निर्माण झाले असावेत, असा वैज्ञानिकाचा अंदाज आहे. ज्या खगोल प्रेमींना व जिज्ञासूंना ६ इंच व्यासाच्या हायरेंज टेलीस्कोपमधून चंद्राचे निरीक्षण करावयाचे आहे, त्यांनी रात्री ७ ते ९ या वेळात विजय म. गिरुळकर, पंचशील ध्वजासमोरील ग्राऊंडवर, गुरुकृपा कॉलनी, वडाळी नाक्याजवळ, चांदूर रेल्वे रोड, अमरावती येथे संपर्क साधावा, अथवा भेट द्यावी. प्रवेश विनामूल्य राहील, असे आवाहन विजय गिरुळकर यांनी केले आहे. चंद्रावरील विवरे म्हणजे उल्कापिंड व खगोलीय वस्तूंच्या आघातामुळे तयार झालेले मोठे खड्डे किंवा विवर आहेत.

चंद्राला वातावरण नसल्यामुळे लहान उल्कापिंड विवरे तयार करू शकतात. या विवरांची निर्मिती लाखो वर्षांपासून उल्कापिंडांच्या वर्षावामुळे झाली.

ट्रॅक्टर अन् दुचाकीच्या धडकेत दुचाकी स्वाराचा मृत्यू, शहरात शोककळा

विदर्भ प्रजासत्ताक दि.२६तिवसा- नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील तिवसा येथील तालुका कृषी कार्यालयानजीक एका ट्रॅक्टर व दुचाकीत धडक झाली. धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात सोमवारी उशीरा रात्री दरम्यान घडला.मृत दुचाकीस्वाराचे नाव लकी उर्फ अक्षय सुरेश शापामोहन (वय २९) असे आहे. मृतक शापामोहन हा स्वतःच्या एमएच २७ बीपी ६९८३ क्रमांकांच्या दुचाकीने आर्वी येथे मित्रांना भेटण्यासाठी गेला होता. परत येताना तिवसा महामार्गावर असलेल्या कृषी कार्यालयापासून काही अंतरावर ट्रॅक्टर व दुचाकीची जबरदस्त अशी धडक झाली. या अपघातात दुचाकीचा समोरील भाग

पूर्णतः चेंदामेंदा होऊन लकी याला गंभीर दुखापत झाली.या अपघातानंतर काही नागरिकांच्या मदतीने त्याला जखमी अवस्थेत तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु गंभीर दुखापत असल्याने डॉक्टरांनी त्याला अमरावती येथे पुढील उपचारासाठी पाठविले. मात्र वाटेतच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूने शहरात हळहळ व्यक्त होत असून मोठी शोककळा पसरली आहे. लकी शापामोहन याचे तिवसा शहरात 'सेवन ब्रो' नावाने कपड्याचे प्रतिष्ठान आहे. त्यामुळे दुपारी ४ वाजता निघालेल्या त्यांच्या अंत्यविधीत शहरातील अनेक लोकं सहभागी झाले होते. त्यात यशोमती ठाकूर यांचाही समावेश आहे.

पेंटिंग करताना विजेच्या तारेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू

वीज वितरण कंपनीवर निष्काळजीपणाचा आरोप

विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अंजनगाव सुर्जी अंजनगाव सुर्जी शहरात दुर्दैवी घटना घडली असून तौफिक शेख अब्दुल रफीक (वय ३२, रा. शनिवारा) या तरुणाचा विजेच्या जिवंत तारेचा शॉक लागून जागीच मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, मोहम्मद तौफिक हा तरुण उस्मान नगर, बुधवारा सुर्जी येथील बबल्या भाई यांच्या घराचे कलर पेंटिंग करण्याचे काम करीत होता. काम सुरू असतानाच पाच ते साडे पाचच्या दरम्यान घराजवळून गेलेल्या जिवंत विद्युत तारेला स्पर्श झाल्याने त्याला जोरदार करंट बसला. या धक्क्यात त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे. संबंधित ठिकाणी जिवंत वीजतारा जमिनीपासून अवघ्या सहा फुटांवर लोंबकळत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. अनेक दिवसांपासून या धोकादायक तारांबाबत तक्रारी करण्यात येत असूनही वीज वितरण कंपनीने दखल न घेतल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे ही गंभीर दुर्घटना घडली आहे. जिवंत तारा इतक्या खाली लोंबकळत असतील तर कोणत्याही क्षणी अशा दुर्घटना घडू शकतात. संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कठोर कारवाई करावी.या अपघातामुळे मोहम्मद तौफिक यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

चांदूरबाजार येथे निवडणूक निरीक्षक प्रमोद गायकवाड यांची भेट

निवडणुकीच्या कामकाजाचा सविस्तर घेतला आढावा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६चांदुर बाजार- नगरपालिका निवडणुकीसाठीचे निरीक्षक प्रमोद गायकवाड यानी आज, मंगळवार, २५ नोव्हेंबरला येथे भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी निवडणूकविषयक कामकाजांची पाहणी केली. मतदान केंद्र, मतमोजणी स्थळ, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शिबीर तसेच सध्या सुरु असलेल्या निवडणूकविषयक कामकाजाचा त्यांनी आढावासुद्धा घेतला.

आगामी २ डिसेंबर रोजी चांदूरबाजार नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने चांदूर बाजारचे निवडणूक निरीक्षक प्रमोद गायकवाड यांनी आज, मंगळवारी येथे भेट देऊन कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी आयोजित दुसऱ्या प्रशिक्षण शिबिरालाही उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी टाऊन हॉलला मतदान यंत्रांची तपासणी केली. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांशी चर्चा करुन त्यांना योग्य त्या सूचनाही दिल्या.

यावेळी त्यांनी निवडणूक प्रक्रिया अचूक पार पाडण्याचे निर्देशही दिले. निवडणूक निरीक्षकांनी आचारसंहिता भंग, कायदा व सुव्यवस्था याबाबत ठाणेदार अशोक जाधव यांच्याकडूनही माहिती घेतली. त्यानंतर निवडणूक निरीक्षकांनी चांदुर बाजार नगर परिषद येथे भेट देऊन प्रचार कार्यालय परवानगी, वाहन परवानगी, बॅनर-पोस्टर परवानगी याबाबत संबंधित यंत्रणेकडून माहिती घेऊन चर्चा केली. तेथे उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना आगामी होणारी निवडणूक भयमुक्त, निष्पक्ष व पारदर्शक पार पाडण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सोनल सूर्यवंशी व सहायक निवडणूक अधिकारी गीता ठाकरेसुद्धा उपस्थित होत्या.



पत्नीच्या हत्या प्रकरणात पतीला जन्मठेपेची शिक्षा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

तीन वर्षाच्या मुलासह विट भट्टीवर राहणाऱ्या पत्नीची हत्या केल्या प्रकरणात येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्र. ५) एस.पी. शिंदे यांनी आरोपी पतीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. दिनेश सुधाकर खेडकर (वय ३६ रा. अंजनशिंगी, धामनगाव रेल्वे) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. तर सबिता दिनेश खेडकर असे मृत महिलेचे नाव आहे.

दोषारोपपत्रानुसार, दिनेश व सविता पती-पत्नी असून त्यांना एक तीन वर्षाचा मुलगा आहे. परंतु पतीच्या त्रासामुळे ती तिच्या मुलासह पतीला सोडून जुना धामणगाव येथील वीट भट्टीवर काम करीत होती आणि तिथेच राहत होती. ८ मार्च २०२२ रोजी दिनेश पत्नीचा शोध घेत वीटभट्टीवर पोहचला. तेव्हा सविता मुलासह तीच्या खेलीत झोपली होती. तेव्हा दिनेश तिच्या खोलीत गेला आणि काही वेळाने सविताचा जोऱ्याने ओरडण्याचा आवाज आल्यामुळे काही महिला मजुर सविताच्या खोलीकडे गेल्या

आणि आत पाहिले असता दिनेश सविताला चाकूने मारत होता तसेच तिच्या पोटावर मोठी जखम होती. तेव्हा कशीतरी ती खोलीच्या बाहेर पळत आली आणि स्वतःचा जीव वाचवीत भट्टीच्या दिशेने जात होती. तिच्याच मागे दिनेश चाकू घेऊन आला आणि तीला झाडाजवळ पकडून चाकूने सपासप वार करून तीची हत्या केली होती.या प्रकरणात सहायक पोलीस निरीक्षक प्रियांका चौधरी यांनी योग्य तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यापैकी चार साक्षीदार हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होते. त्यांच्या माध्यमातून आरोपीची ओळख परेड घेण्यात आली होती. वरील प्रकरणामध्ये साक्षीदारांचे जवाब व लेखी-तोंडी पुराव्यावरून जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.पी. शिंदे यांनी आरोपी दिनेश सुधाकर खेडकर याच्याविरुध्द हत्येचा गुन्हा सिद्ध होत असल्याचे घोषित करून जन्मठेपेची शिक्षा व २ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिन्याचा सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात सरकारच्या वतीने सहायक सरकारी वकील ॲड. सोनाली क्षिरसागर यांनी युक्तीवाद केला.

तसेच सहायक पोलीस निरीक्षक प्रियांका चौधरी, महिला पोलीस अंमलदार अर्चना डांगे, कोर्ट पेहरवी दिलीप सावरकर यांनी सहकार्य केले.

नियतीचा क्रूर खेळ! अक्षता पडल्या अन् नवरदेवाचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

मंगलाष्टकांचे सूर, सनईचे मंजूळ वादन आणि आप्तेष्टांची लगबग.. लग्नमंडपात आनंदाचे वातावरण असतानाच नियतीने क्रूर डाव साधला. लग्नाच्या अक्षता डोक्यावर पडल्यानंतर अवघ्या काही तासांतच नवरदेवाचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना वरूड तालुक्यातील पुसला येथे घडली. अमोल प्रकाश गोडबोले (वय ३१) असे मृत नवरदेवाचे नाव असून, या घटनेमुळे वऱ्हाडी मंडळींवर आभाळच कोसळले आहे. अमोल हे महसूल सेवक म्हणून कार्यरत होते. त्यांचे लग्न नागपूर जिल्ह्यातील मोवाड येथील तेजस्विनी हिच्याशी ठरले. मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी

त्याचा लग्न सोहळा पुसला येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. सकाळपासून लग्नमंडपी वऱ्हाडी मंडळीची मांदियाळी सुरू होती. सनईचे मंजुळ स्वर कानी पडत होते. वाजत-गाजत नवरदेव अमोल लग्नमंडपात दाखल झाले. मित्रांच्या थट्टा मस्करीत लग्नघटिका समीप आली. अक्षदांची उधळण करीत मंगलाष्टकांच्या मंजुळ स्वरात अमोल व तेजस्विनी या दोघांचा विवाह मोठ्या थाटात पार पडला. लग्न लागताच थोरा मोठ्यांनी नवदाम्पत्याला आशीर्वाद देणे सुरू झाले. त्याचवेळी अमोल यांना अस्वस्थ वाटू लागले. ते घामाघूम झाले.

त्यांना तातडीने उपचारासाठी पुसला येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथून त्यांना एका खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, नियतीला काही वेगळेच मान्य होते. रुग्णालयात पोहोचताच अमोल यांचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्याचे निदान करण्यात आले. अमोल यांच्या मृत्यूची बातमी वाऱ्यासारखी लग्न मंडपी पसरली. एका क्षणात होत्याचे नव्हते झाले अन् लग्न मंडपात शोककळा पसरली. नववधू तेजस्विनीवर आभाळ कोसळले.अमोल यांच्या मृत्यूची बातमी लग्नमंडपात धडकताच एकच कल्लोळ उडाला. आनंदाचे रुपांतर क्षणात आक्रोशात झाले. वऱ्हाड्यांनी खच्चून भरलेला लग्नमंडप रिकामा झाला. अवघ्या काही तासांपुर्वीच ज्याच्या गळ्यात वरमाला घातली, त्या जोडीदाराच्या निधनाने नववधू तेजस्विनी यांना जबर मानसिक धक्का बसला आहे. या घटनेमुळे पुसला गावावर शोककळा पसरली असून महसूल कर्मचारी आणि ग्रामस्थांमधून हळहळ व्यक्त केली जात आहे.

हृदयरोगाचे प्रमाण वाढले

हृदयरोगाचे प्रमाण एकेकाळी ५० ते ६० वयोगटापलिकडच्या लोकांमध्ये असे, मात्र आता ते हळूहळू खाली येत तरुणांमध्येही हृदयरोगाच्या धक्क्याचे प्रमाण वाढलेले दिसते. तारुण्यात हृदयविकार होऊन अकाली मृत्यू येणे यामागे अनेक कारणे आहेत. ती शोधण्यासाठी सरकार आणि यंत्रणेने योग्य विश्लेषण केले पाहिजे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

काँग्रेस पक्षाने दिली होती उमेदवारी, मात्र अर्ज ठरला बाद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६दर्यापूर निवडणूक लढविण्याची इच्छा बाळगत उमेदवारी दाखल करणाऱ्या भवानी वेष परिसरातील (प्रभाग २) ज्येष्ठ नागरिक देविदास काळे यांना न्यायालयाने दिलासा देत अपक्ष म्हणून निवडणूक लढण्याची परवानगी दिली आहे.

वयाची ७५ वी गाठलेले देविदास काळे हे भवानी वेष परिसरातील सामाजिक कार्यकर्ते आहेत. मृत शरीराची सेवा करणारा अवलिया म्हणून ते सर्वदूर परिचित आहेत. परिसरातील रहिवाशांच्या

देविदास काळे यांना न्यायालयाचा दिलासा

आग्रहास्तव ते निवडणुकीत उभे राहिले होते.काँग्रेस पक्षाने त्यांना एबी फार्मसुध्दा दिला होता. त्यामुळे त्यांनी आपले नामांकन दाखल केले होते. परंतु एकाच प्रभागात दोघांनी एबी फॉर्म दाखल केल्याने निवडणूक विभागाने देविदास काळे यांच्या अर्ज खारीज केला. त्यांनी या संदर्भात दर्यापूर येथील वरिष्ठ न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने देविदास काळे यांना दिलासा देत अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्यासाठी पात्र असा निर्णय दिला आहे.--

राखेच्या जड वाहनाविरोधात ग्रामस्थांचा ठिय्या

रस्त्याची बिकट स्थिती, मजबुतीकरणाची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ शिराळा- डवरगाव एमआयडीसी ते शिराळा फाटा या मार्गावरील रस्त्याची अत्यत खराब अवस्था झाली आहे. औष्णिक प्रकल्पातील राख वाहतूक करणाऱ्या जड वाहनांमुळे वाढलेले प्रदूषण आणि सतत घडणाऱ्या अपघातांच्या विरोधात स्थानिक युवकांसह ग्रामस्थांनी शिराळा येथे मंगळवारी (ता. २५) ठिय्या आंदोलनाद्वारे संताप व्यक्त केला. प्रशासनाला अनेक तक्रारी आणि निवेदन दिल्यानंतर कोणतीही प्रशासकीय ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थ संतापून रस्त्यावर उतरले. राख भरलेल्या दहा चाकी ट्रकची मोठ्या प्रमाणात वाहतूक या मार्गावरून होत असल्याने डांबर पूर्णपणे उखडले आहे आणि रस्त्यावर खोल खड्डे पडले आहेत. धूळ राख हवेत उडत असल्याने विद्यार्थ्यांपासून ते महिलांपर्यंत सर्व नागरिकांना श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ आणि अपघाताचा धोका वाढला आहे.

या परिस्थितीवर नाराज झालेल्या युवकांनी ट्रक अडवून जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनादरम्यान तणाव निर्माण झाल्याने वलगाव पोलिसांनी एका आंदोलकाला ताब्यात घेतले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आणखी संताप वाढला. पोलिसांनी अनावश्यक दडपशाही केल्याचा आरोप आंदोलकांनी केला.सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्याची पाहणी करून डांबरीकरण आणि मजबुतीकरणाचे काम सुरू करावे. तसेच रस्ता पूर्णपणे दुरुस्त होईपर्यंत राख वाहतूक करणाऱ्या जड ट्रकच्या वाहतुकीवर बंदी घालावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. या आंदोलनामुळे काहीवेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही युवकांनी दिला आहे. या आंदोलनामध्ये गावातील बहुसंख्य युवक सहभागी होते.

महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीत हेराफेरी

काँग्रेसचा गंभीर आरोप -प्रभागांच्या याद्या चुकल्या

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीचे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने सखोल अभ्यास व निरीक्षण करण्यात आले असता, त्यात अत्यंत गंभीर व मोठ्या प्रमाणावर त्रुटी व जाणीवपूर्वक हेराफेरी आढळून आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबतची माहिती मंगळवारी श्रमिक पत्रकार भवनात आयोजित पत्र परिषदेत देण्यात आली.

संपूर्ण २२ प्रभागांच्या प्रारूप यादीत ज्या भागात काँग्रेस पक्षाची मोठी मतदारसंख्या आहे, अशा ठिकाणी प्रभागनिहाय २,५०० ते ३,५०० मतदारांची नावे कृत्रिमरीत्या दुसर्या प्रभागात हलविल्याचे काँग्रेस पदाधिकार्यांनी म्हटले आहे. उदाहरणा दाखल सांगण्यात आले की, प्रभाग क्र. १ मधील हजारो मते प्रभाग क्र. ७ मध्ये टाकण्यात आली. प्रभाग क्र. ८ मधील सुमारे ३,५०० मते प्रभाग क्र. ११ व प्रभाग क्र. ७ मध्ये हलविण्यात आली. प्रभाग क्र. २० ची मते प्रभाग क्र. १८ मध्ये टाकण्यात आली आहेत. अशा प्रकारे शहरातील जवळपास सर्वच २२ प्रभागांमध्ये काँग्रेसची बलस्थाने असलेल्या भागातील मतदारांची नावे दुसर्या प्रभागात हस्तांतरित करून मतदारयादीत मोठ्या प्रमाणात हेराफेरी करण्यात आली आहे. ही सरळ सरळ मतांची चोरी आहे आणि शहरातील जनतेची स्पष्ट दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे.गेल्या ९ वर्षांपासून अमरावती महापालिकेवर भारतीय जनता पार्टी व त्यांचे सहकारी म्हणजेच महायुतीची सत्ता आहे. या कालावधीत शहराच्या विकासासाठी एकही ठोस पाऊल उचलले गेले नाही, या उलट शहराची अवस्था अत्यंत भकास करून ठेवलेली आहे. आता जनतेमध्ये प्रचंड रोष असल्याचे व आपली सत्ता जाणार हे लक्षात आल्याने सत्ताधारी पक्षाने निवडणूक प्रक्रियेतच हस्तक्षेप करून मतदारयादीत मोठ्या प्रमाणात फेरफार केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

राज्यात एकाचवेळी विद्यार्थ्यांची उपस्थिती पडताळणी

...तर शिस्तभंगाची कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती-

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून संचमान्यता ही यु-डायस प्लस प्रणालीमधील मुख्याध्यापकांनी नमूद केलेल्या माहितीच्या आधारे केली जाणार आहे. यु-डायस प्लस प्रणालीवर मुख्याध्यापकांच्या लॉगिनमधून विद्यार्थ्यांविषयी माहिती भरण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थ्यांची माहिती संच मान्यतेकरिता विचारात घेतली जाते. या माहितीचे प्रमाणीकरण व सत्यता पडताळणीची जबाबदारी ही केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकारी यांची आहे. याकरिता कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याबाबत शिक्षण संचालनालया ने दिलेल्या पत्रानुसार राज्यात एकाचवेळी सर्व शाळांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती पडताळणी होणार आहे. या कामात कुचराई झाल्यास शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केल्या जाणार आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांची यु डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती भरण्यात येते. केंद्रप्रमुखांनी काळजीपूर्वक त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची खातरजमा करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये अनियमितता झाल्यास तशी जबाबदारी केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (बीट) व गटशिक्षणाधिकारी व मुख्याध्यापकावर निश्चित करण्यात येईल. यू-डायस प्लसकडील स्टुडंट पोर्टलवर प्राप्त झालेली माहिती केंद्रप्रमुख यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांची दैनिक उपस्थिती, भेटीच्या दिवशी हजर असलेले विद्यार्थी, परीक्षा दिनांकास उपस्थित असणारे विद्यार्थी तसेच यापूर्वी शाळेला भेट दिली असल्यास त्या दिवशीची दैनिक उपस्थिती या सर्वांचा विचार करुन केंद्रप्रमुखांनी त्यांच्या लॉगिनमधून बनावट विद्यार्थी किंवा सतत गैरहजर असणारे किंवा केवळ शिक्षक, शिक्षकेतर पदे मजूर होण्यासाठी जाणीवपूर्वक वाढविलेले पट, आदीसारखे विद्यार्थी संच मान्यतेकरिता फॉरवर्ड होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

सचिन तेंडुलकरच्या व्याघ्रदर्शनासाठी इतर पर्यटकांची कोंडी

तो क्रिकेटचा देव असला म्हणून काय झाले?, संतप्त पर्यटकांचा सवाल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६नागपूर :

मास्टरब्लास्टर, क्रिकेटचा देव अशी बिरुदावली नावापुढे लागलेल्या सचिन तेंडुलकरचे व्याघ्रप्रेम जगजाहीर आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प आणि उमरेड-कऱ्हाडला अभयारण्य याठिकाणी वर्षातून एकदा तो हमखास येणारच. आतापर्यंत त्याच्या येण्याचे, व्याघ्रदर्शनाचे साऱ्यांनाच आकर्षण होते, पण हल्ली त्याच्या येण्याने इतर पर्यटक मात्र नाराज होऊ लागले आहेत. अलीकडेच ही नाराजी दर्शविणारा आणखी एक किस्सा उमरेड-कऱ्हाडला अभयारण्यात घडला.

शुक्रवारी सचिन तेंडुलकर पत्नी अंजली तेंडुलकर आणि मित्रांसह ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पत पर्यटनासाठी आला. त्यादिवशी त्याने दुपारची सफारी केली. वाघाने त्याला निराश केले. त्यामुळे शनिवारी सकाळ, सायंकाळ आणि रविवारी सकाळी त्याने ताडोबात सफारी केली आणि शेवटी एकदाचे त्याला व्याघ्रदर्शन झाले. त्यानंतर व्याघ्रदर्शनासाठी त्यांनी आपला मोर्चा उमरेड-कऱ्हाडला अभयारण्याकडे वळवला. सध्या या अभयारण्यात एफ टू वाघीण आणि तिच्या बछड्यांसाठी पर्यटकांची रीघ लागली असते आणि सचिन तेंडुलकर देखील तिच्याच

दर्शनासाठी आला होता. बांबू रिसॉर्टच्या महिंद्रा एसयुव्ही ३०० या सफारी वाहनात कन्व्हर्ट केलेल्या वाहनाने तो आत आला, पण त्याला काही एफ टू वाघीण आणि तिचे बछडे दिसले नाही. त्यामुळे गाडीतच तो डोळ्यावर गॉगल आणि डोक्यावर कॅप लावून बसला होता. त्यामुळे इतर पर्यटकांनी त्याचे फोटो काढले. गोठणगाव गेटवरील मोरूपार रस्त्यावर ही वाघीण आणि तिचे बछडे बसले होते. इतर पर्यटकांना ते दिसले. दरम्यान, इतर पर्यटकांना बाहेरच थांबवण्यात आले आणि त्यांच्या कॅमेऱ्यातून घेतलेले सर्व फोटो त्यांना डिलीट करायला सांगितले. दरम्यान, पार्किंगच्यामागे एफ टू वाघीण व तिचे बछडे असल्याने पर्यटकांनी फोटो घ्यायला सुरुवात केली, तर त्यांनाही थांबवण्यात आले. त्यावेळी सचिन तेंडुलकर बांबू रिसॉर्टच्या वाहनातून उतरून वनविभागाच्या जिप्सीत बसला आणि ही जिप्सी नॉन टुरिझम एरियात गेली. त्यावेळी देखील पर्यटकांना फोटो घेण्यापासून थांबवण्यात आले.ज्यांनी ३०-४० हजार रुपये भरून पूर्ण दिवसाची सफारी बुक केली, त्यांनाही केवळ सचिन तेंडुलकर मुळे अडवून ठेवण्यात आले. तर दुपारची सफारी करणाऱ्या पर्यटकानासुद्धा अडवून ठेवले. एवढेच नाही तर काही पर्यटकांचे त्यादिवशीचे बुकिंग रद्द करण्यात आले. याचा फटका विदेशी पर्यटकानासुद्धा बसला. विशेष म्हणजे सचिन तेंडुलकर सोबत चार गाड्या होत्या आणि त्या एकही गाडीत पर्यटक मार्गदर्शक नव्हता. पर्यटकांनी काढलेले फोटो देखील डिलीट केल्यामुळे कोणताही पुरावा मिळाला नाही. सर्वसामान्य पर्यटकांनी नियम मोडले तर कारवाई आणि सेलिब्रिटी साठी मात्र सर्व माफ का, असा प्रश्न यावेळी पर्यटकांनी उपस्थित केला. दरम्यान, प्रशासनाने मात्र असे काहीही घडले नसल्याचा दावा केला.

धारणी खरेदी केंद्रावर महामंडळाकडून मका खरेदी सुरू; आदिवासी शेतकऱ्यांना दिलासा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६धारणी

आदिवासी विकास महामंडळाच्या धारणी खरेदी केंद्रावर मका खरेदी उपक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. यामुळे धारणीसह आसपासच्या आदिवासी भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या हंगामी पिकाला न्याय्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उद्घाटन समारंभसाधेपणाने, पण उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाला प्रकल्प अधिकारी शुक्ला, प्रादेशिक व्यवस्थापक आमटे, केंद्रप्रमुख सौ. अंबिका चोरे, नायब तहसीलदार माळी, उपप्रादेशिक व्यवस्थापक वानखेडे, तसेच परिसरातील

अग्रगण्य शेतकरी दिलीप मालवीय आणि अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन करताना प्रकल्प अधिकारी शुक्ला यांनी सांगितले की, आदिवासी विकास महामंडळ नेहमीच शेतकऱ्यांच्यासमर्थनासाठी काम करत असून, मका खरेदी केंद्र सुरू झाल्याने शेतकऱ्यांना चडझ (किमान आधारभूत किंमत) वर थेट विक्रीची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यांनी स्पष्ट केले की, या उपक्रमामुळे दलालांचे प्रमाण कमी होईल आणि शेतकऱ्यांना त्यांच्या परिश्रमाला योग्य मोबदला मिळू शकेल.

प्रादेशिक व्यवस्थापक आमटे यांनी सांगितले की, खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राहावी यासाठी ऑनलाईन नोंदणी, वजन काटयांची अचूकता आणि पेमेंटची वेळेवर पूर्तता याकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून खरेदी केंद्रावर पाणी, सावली,पावसापासून संरक्षण यांसारख्या मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.केंद्रप्रमुख सौ. अंबिका चोरे यांनी खरेदी प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली.आवश्यक कागदपत्रे, नोंदणी पद्धत, नमुना तपासणी, वजन प्रक्रिया आणि पेमेंटची पद्धत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, यावर्षी मका उत्पादन चांगले असून अधिकाधिक शेतकऱ्यांनी खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा.धारणीचे नायब तहसीलदार माळी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले, तरउपप्रादेशिक व्यवस्थापक वानखेडे यांनी खरेदी केंद्राची कार्यपद्धती सुरळीत ठेवण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने काम करत असल्याचे सांगितले. कार्यक्रमात उपस्थित शेतकरी दिलीप मालवीय यांनी शासन आणि महामंडळाच्या उपक्रमाचे स्वागत केले. मका खरेदी केंद्रामुळे शेतकऱ्यांना थेट फायदा होईल आणि त्यांच्या मेहनतीचे योग्य मूल्यमापन होईल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.उद्घाटनानंतर केंद्रावर मका खरेदी प्रक्रिया प्रत्यक्षात सुरूझाली असून अनेक शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नोंदणी व विक्री केली. यासंपूर्ण उपक्रमामुळे आदिवासी शेतकरी वर्गाला थेट आर्थिक मदत मिळणार असून कृषी क्षेत्राला नवी उमेद मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दर्यापूर तालुक्यात अवैध रेती वाहतूक व इतर गुन्ह्यात पाच जणांवर पोलिसांची कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६दर्यापूर

तालुक्यात येवदा पोलिसांनी २२ नोव्हेंबर रोजी लोतवाडा ते पिंपळोद रोडवर अवैध रेती वाहतुकीवर धडक कारवाई केली. या कारवाईत आदित्य भारत धोटे वय २२ रा. पिंपलोद आणि सागर पांडुरंग जंगले वय ३९ रा. सोनखेड यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालात ट्रॅक्टर व ट्रॉली अंदाजे पाच लाख रुपये, एकर ब्रास रेती सात हजार रुपये आणि पल्सर मोटारसायकल पन्नास हजार रुपये असा एकूण पाच लाख सत्तावन्न हजार रुपयांचा समावेश आहे. या दोघांविरोधात कलम ३०३(२) इछड अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान भुईखेड येथील सचिन सोळंके वय २६, महेश नाना मानकर वय ३२ आणि अभय नाना मानकर वय २८ या तिघांवरही पोलिसांनी स्वतंत्र गुन्हा नोंद केला असून त्याबाबतचा तपास सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली झडख विशाल रोकडे आणि झडख सागर हटवार यांच्या पथकाने केली.

निमिया मुक्त गावाकडे आशा वर्करचा तेवढाच सहभाग

विदर्भ प्रजासत्ताक
दि..२६दर्यापूर

निमिया मुक्त गाव अभियान या मोहिमे अंतर्गत सहाय्यक ट्रस्ट मुंबई आणि माहेर वुमन्स मल्टीपर्पज फाउंडेशन परतवाडा जिल्हा-अमरावती. यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या दर्यापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र रामतीर्थ येथे प्रशिक्षण देण्यात आले. आजची परिस्थिती लक्षात घेता किशोरवयीन मुला-मुलींवर कुपोषणामुळे झालेला परिणाम इतरत्र दिसत आहे. त्यावर उपाय म्हणून रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये संतुलित आहार घेणे किती महत्त्वाचे आहे आणि गरोदरपणात गरोदर मातेने आपल्या आहाराविषयी किती काळजी घ्यायला पाहिजे आणि ती काळजी घेणे किती आवश्यक आहे जन्माला येणारे मुलं हे निमिक नसावं हा मुद्दा लक्षात घेतला त्याचप्रमाणे प्रशिक्षणामध्ये रामतीर्थ, सासन, रामापुर. सासन बू, रुस्तमपूर, भुईखेड, लोतवाडा क्रमांक १ व क्रमांक २ , चांदखेड ,म्हैसपूर, पायरवीर, भामोद, गोलेगाव,करतखेडा, सोनखेड, रामागड, तोंगलाबाद, सामदा, चांडोळा, लासुर, लोहीखेडा, नाद्रून, या २४ गावाच्या आशा वर्कर होत्या. प्राथमिक आरोग्य केंद्र रामतीर्थ सुपरवायझर वैशाली गावंडे मॅडम, त्याचप्रमाणे प्रशिक्षक - मास्टर ट्रेनर सौ कांचन सुशांत भांडे यांनी प्रशिक्षण दिले. निमिया हा आजार नसून ही एक परिस्थिती आहे, त्यांच्या प्रशिक्षणातून सांगितले, आणि २४ ही गावा-गावात परसबागी लावण्याचा उपक्रम हाती घेऊ अशी हमी आशा वर्कर यांनी दिली.

न्यायालयीन आदेशाने अंजनगाव सुर्जीतील निवडणूक रंगत बदलली

वंचितचे नगराध्यक्ष व नगरसेवक दोन्ही उमेदवार पात्र : शिवसेना उबाठा गटाचे नगरसेवक पदाचे प्रभाग ६ चे उमेदवार अपात्र : चार अपत्याने उमेदवारी गोत्यात: निवडणूक निकालापूर्वीच उबाठा गटाला धक्का

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अंजनगाव सुर्जी

नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे दावेदार सहा उमेदवार व २८ नगरसेवकपदाच्या जागाकरिता प्रमुख पक्षांचे उमेदवारांसह अपक्ष १७३ उमेदवार रिंगणात असताना नगराध्यक्ष व नगरसेवक पदामधून वंचितची उमेदवारी खारीज झाली होती, तर दुसऱ्या प्रकरणात नगरसेवक पदामधून उबाठावर आक्षेपासह निवडणूक निर्णय अधिकाऱ्याविरोधात दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर दर्यापूरन्यायाधीकरणात सुनावणीस दाखल होते व वंचित प्रकरणात शिवसेनेच्या प्रभाग ६(अ) मधील उमेदवाराची उमेदवारी खारीज झाली असल्याने व वंचितचे नगराध्यक्ष व नगरसेवक दोन्ही उमेदवार पात्र झाल्याने अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीत न्यायालयाचे निर्णयाअंती चित्र बदलले आहे.नगरपरिषद निवडणुकीत प्रमुख पक्षाच्या उमेदवारांची प्रचार चिन्हाची निश्चिती झाल्याने प्रचार सुरु झाला; परंतु नगरपरिषद अंतर्गत प्रभाग ६ (अ) मधील उमेदवार जकीया परविन मो. राजिक (उबाठा) यांच्या अर्जावर एमआयएमच्या उमेदवाराने आक्षेप घेतला. प्रभाग ५ (अ) चेउमेदवार रुखराना बानो शे. नाझीम यांनी जकीया परविन मो. राजिक यांना चार अपत्य व त्यातील तीन अपत्य २००१ नंतर आहे म्हणून आक्षेप दाखल केला होता. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जकीया परवीन यांची उमेदवारी कायम ठेवल्याने त्यांच्याविरुद्ध प्रकरण दिवानी न्यायालय कनिष्ठ स्तर दर्यापुर न्यायाधिकरणात दाखल झाले होते. न्यायाधिकरणाकडून दस्तावेज पडताडणीअंती आक्षेप दाखलकर्ते यांचेआक्षेपामध्ये तत्थ आढळुन आल्याने जकीया परविन मो. राजिक यांची उमेदवारी खारीज झाली. त्यामुळे त्या आपात्र घोषित करण्यात आल्या. या अनपेक्षित निर्णयाने निवडणूक निकालाआधीच प्रभाग क्र. ६ अ मधून उबाठा गटाला धक्का बसला आहे. तसेच वंचितचे दोन्ही उमेदवार (नगराध्यक्ष व सदस्य) मधून आकाश सु. राऊत यांचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामंजूर केलेला अर्ज दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर दर्यापूर यांनी त्यांच्या अपिलावरआदेश देवून नामनिर्देशन मंजूर करण्यात केला. त्यामुळे आकाश सु. राऊत हे अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अध्यक्षपदासाठी वंचित बहुजन पक्षाकडूनउमेदवार म्हणून कायम आहेत, तर सदस्य पदाकरिता वंचित बहुजन पक्षाकडून उमेदवार सय्यद अझहरुद्दीन सय्यद अमीनुद्दीन यांचा नामंजूर करण्यात आलेला उमेदवारी अर्ज दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर दर्यापूर यांनी त्यांच्या अपिलावर आदेश देवुन नामनिर्देशन मंजूर केला आहे. सय्यद अझहरुद्दीन सय्यद अमीनुद्दीन हे अंजनगाव सुर्जी नगरपरिषद प्रभाग क्रं. ७(ब) मधुन वंचित बहुजन पक्षाकडून उमेदवार म्हणून कायम झाल्याने नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाकरीता ७ उमेदवारांमध्ये तरनगरसेवक पदाकरिता १७३ उमेदवारांची लढत निश्चित झाली आहे.

हिंगणघाट बाजार समिती मध्ये मिळतो कापसाला सर्वोत्तम भाव

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६वर्धा

उत्पादन होते पण उत्पन्न मिळत नाही, असे विदर्भातील शेतकऱ्यांबाबत म्हटल्या जात असते. म्हणजे शेती पिकली तरी भाव मिळत नसल्याने फारसे उत्पन्न हाती लागत नसल्याची ओरड होते. पण विदर्भात काही बाजार समित्या आहेत. या ठिकाणी प्रतवारीनुसार योग्य भाव देण्याचा प्रयत्न बाजार समिती संचालक करतात. तसेच माल ठेवण्यास पुरेशी जागा उपलब्ध असते. शिवाय ग्रामीण भागातून येणाऱ्या दुर्बल शेतकऱ्यांना परवडेल असे भोजन पण उपलब्ध करून दिल्या जाते.

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजारपेठ इंग्रजांच्या काळापासून प्रसिद्ध आहे. हिंगणघाट बाजार समितीने भरच टाकल्याची पावती भेटी देणारे देतात. या बाजार समितीत केवळ वर्धा जिल्ह्यातूनच नव्हे तर लगतच्या जिल्ह्यातून पण मोठ्या प्रमाणात शेतमालाची आवक होत असते. संपूर्ण विदर्भातील मार्केट यार्डच्या ऑनलाईन प्रणालीवर येथील कापसास सर्वाधिक भाव मिळत असल्याची आकडेवारी पुढे आली आहे.

हिंगणघाट बाजार समितीत कापूस खरेदीस १० नोव्हेंबरपासून सुरवात झाली. सुरवातीस कमी भाव मिळाला. कारण कापसात थोडा ओलावा होता. तो कमी होत गेल्यावर व ग्रेड वाढत गेल्याने चांगला भाव मिळण्यास सुरवात झाली. परिणामी गत दोन दिवसापासून वर्धाच नव्हे तर नागपूर, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ईथे कापूस विक्रीस आणल्याची नोंद झाली आहे.

अजान पार्कमध्ये अवैध गॅस रिफिलिंगवर पोलिसांचा छापा; तीन आरोपी अटकेत, २.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

पोलीस आयुक्तालयाच्या गाडगे नगर पोलीस ठाण्यास गोपनीय माहिती मिळाली की, नवसारी चौकाजवळील अजान पार्क परिसरात काही व्यक्ती रिक्षामध्ये अवैधरीत्या गॅस रिफिलिंग करत आहेत. माहितीची खातरजमा करण्यासाठी पथकाने तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. तेथे पोहोचल्यावर तीन व्यक्ती प्रत्यक्ष गॅस रिफिलिंग करताना आढळले.

कारवाईदरम्यान मोहम्मद अल्मास मोहम्मद तुफेल (२१), रा. मेमन कॉलनी, हा गॅस रिफिलिंग करताना पकडला. त्याच्यासोबत अयान

खान युनुस खान (२०), रा. फरीद नगर, हा रिक्षाचालक तसेच इरफान खान बिस्मिल्ला खान, हा दुकान मालक आढळला. तिघेही रिक्षामध्ये अवैध पद्धतीने गॅस भरण्याच्या कामात गुंतलेले असल्याचे स्पष्ट झाले.

छाप्यात भरलेले १२ सिलेंडर, रिकामे ११ सिलेंडर, असे एकूण २३ सिलेंडर, गॅस रिफिलिंगचे साहित्य तसेच एक रिक्षा असा एकूण २,७१,७३० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध गॅस रिफिलिंगमुळे गंभीर अपघाताचा धोका संभवत असल्याने पोलिसांनी ही कारवाई केली.आरोपींवर संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील कायदेशीर तपास सुरू असल्याची माहिती गाडगे नगर पोलिसांनी दिली.

तिवसा मोझरी येथील शाळेत युवती स्वसंरक्षण स्वाश्रिता अभियान याला उत्स्फूर्त प्रतिसाद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ तिवसा

वॉरिअर्स स्पोर्ट्स अँड मल्टीपर्पज अकादमी अमरावती द्वारा संचालित शहरातील नामांकित कराटे प्रशिक्षण संस्था वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मार्शल आर्टस् अकादमी अमरावतीच्या वतीने स्वाश्रीता अभियान अंतर्गत युवती स्वसंरक्षण एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन ज्ञानमाता स्कुल तिवसा, सनराईस इंग्लिश स्कुल तिवसा, कृष्णाबाई दांडाळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तिवसा, वाडेकर इंगलीश स्कुल गुरुकुंज मोझरी येथे शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी सकाळी प्रशिक्षण देण्यात आले. प्रसंगी वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मार्शल आर्टस् अकादमी अमरावतीचे सचिव व मुख्य प्रशिक्षक सेन्सई उमेश भा. मोवळे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात व सहाय्यक प्रशिक्षक ललित ढोके, सागर मेश्राम, आशिष वाघमारे, जय कारंजकर, पिंकी प्रजापती,आयुष चौधरी,कृष्णा वाघमारे, सार्थक घोंगडे, स्वराज नाईकनवरे, जीविका जवांजाळ, तनिश मोवळे, स्वराज घोंगडे, साई चेडे, काव्या कुलकर्णी, यांच्या प्रमुख उपस्थित १००० हुन अधिक विद्यार्थी-विद्यार्थीनीना या शिबिरात आत्मसंरक्षणाचे धडे देण्यात आले.

कार्यक्रमाप्रसंगी ज्ञानमाता स्कुल तिवसाचे फादर सुरजीत तिरके, सिस्टर निर्मला दगम, अमित गावंडे, कविता पळसपगार, मीनाक्षी माहोरे, वैशाली खडसे, कविता ठाकरे, सिस्टर ज्योति, मेघा पडघन, मेघा क्षीरसागर, मिस राशि, मिस अपर्णा, मिस सोनाली व इतर ज्ञानमाता स्कुलचे शिक्षक वृंद उपस्थित होते.

विवेक शिक्षण संस्था अमरावतीचे सचिव विद्याधर दंडाळे, छायाताई दंडाळे. सनराईज इंग्लिश स्कूल तिवसाचे मुख्याध्यापिका रजनी माहोरे, धीरज तायवाडे. कृष्णा बाई दंडाळे विद्यालय तिवसाचे एम टी फळे, सुनील बुरधाटे, विश्वजित दंडाळे, कोमल दंडाळे. वाडेकर स्कुल गुरुकुंज मोझरीचे डॉ.रघुनाथ वाडेकर मुख्याध्यापिका हिना बटविया, प्रा.सुजित काळमेघ, मुक्ती बाभूळकर, रूपाली इंगोले, अश्विनी खैरकर आदि उपस्थित होते. व इतर शिक्षक वृंद उपस्थित होते.

युवा स्वाभिमान पार्टीचा भाजप नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा

युवा स्वाभिमान पक्षाचे निवडणूक कोअर कमिटीने घेतला निर्णय

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ अमरावती

अमरावती भारतीय जनता पक्षाच्या नगरपरिषद व नगरपंचायत नगराध्यक्ष पदाच्या कमळ निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवित असलेल्या फक्त नगराध्यक्ष पदाचे उमेदवारांना युवा स्वाभिमान पार्टीने जाहीर पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून, हा निर्णय को अर कमिटीच्या बैठकीत जाहीर केला.

या निर्णयानुसार अमरावती जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत हद्दीतील भाजप वे नगराध्यक्ष पदाचे उमेदवारांना युवा स्वाभिमान पार्टी निवडणुकीत पूर्ण शक्तीनिशी मदत करणार आहे.तसेच ज्या ज्या नगरपरिषद, नगरपंचायत मध्ये ठिकाणी युवा स्वाभिमान पार्टीचे उमेदवार स्वतः निवडणूक लढवत आहेत. तेथे मैत्रीपूर्ण लढत करून पूर्ण ताकदीने युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार निवडणुक आणण्याचा संकल्प स्वाभिमान पक्षाचे निवडणूक निर्णय समितीकडून ठराव मंजूर करून निर्णय घेतला या साठी पूर्ण ताकदीने युवा स्वाभिमान पक्षाचे नेते व पदाधिकारी व कार्यकर्ते कामी लागले आहे असेही कोअर कमिटीने स्पष्ट केले.

नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवत असलेल्या उमेदवारांना युवा स्वाभिमान पार्टीन या सर्व उमेदवारांना अधिका पाठिंबा जाहीर केला आहे. पक्षाच्या निर्णयामुळे दोन्ही पक्षांत मैत्रीपूर्ण वातावरणात निवडणुकीची लढत होणार आहे, युवा स्वाभिम पक्षाचे निवडणूक निर्णय कोअर कमिटीच्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठ कात्रे, मार्गदर्शक सुनील राणा, राष्ट्रीय सचिव वानखडे, महासचिव प्रा. अजय गाडे. कोषाध्यश शैलेंद्र कस्तुरे सल्लागार हरीशजी चरपे, ॲड. नंदेश अंबाडकर, सुखदेव तरडेजा,मालाणी सत्यद्रासिंग लोटे, संजय मुनोत, सुखदेवराव कावरे, दादाराव महल्ले, लक्ष्मणराव लाठेकर विनोद जायलवाल, विषा कुलकर्णी हसैन सुभेदार, इंजी. गुर्जर, बाळू इंगोले, प्रवक्ते नाना आमले गणेशदास गायकवाड जिल्हाअध्यक्ष अजय देशमुख.जिल्हाध्यक्षा सोनाली नवले, संजय हिंगासपुरे, ज्योती सैरिसे. सुमती ढोके आशिष कावरे मंगेश पाटील इंगोले, अजय घुले, दिनेश टेकाम, विलास वाडेकर, बंडु डकरे जगदिश अंबाडकर, मनिष अग्रवाल, राजु चुनकीकर, श्रीकांत इंगळे, दिनेश सेठीया, गंगाधर आवारे, पवन हिंगणे, प्रा.संतोष बनसोड, प्रा.सतीश खोडे, समाधान वानखडे, शिवदासजी घुले, रत्नाकर चरडे, किशोर अंबाडकर, किरण अंबाडकर, संदिप गुल्हाने, प्रविण सावळे, अजय जयस्वाल, अनुप अग्रवाल, मिलींद कहाळे, गजेंद्र बाँडे, निती अनासाने, अविनाश काळे आदी उपस्थित होते.

भाजपाकडून नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवीत असलेले उमेदवारयांना दिला जाहीर पाठिंबा

१. चिखलदरा : श्री. राजेंद्रसिंह सोमवंशी २. अंजनगाव सुर्जी : श्री. अविनाश गायगोले ३. अचलपूर : सौ. रुपाली अभय माथणे, ४. दर्यापूर : सौ. नलिनी प्रकाश भारसाकळे ५. चांदूर रेल्वे : सौ. स्वाती शैलेंद्र मेटे ६. मोर्शी : सौ. रश्मी नितीन उमाले ७. चांदूरबाजार : सौ. कांता अहिर, (टिंकु अहिर) ८. शेंदुरजनाघाट : सौ. सुवर्णा वरखेडे, ९. वरुड : श्री. ईश्वर सलामे, १०. नांदगाव खंडेश्वर : सौ. स्वाती राजेश पाठक, ११. धामणगाव रेल्वे : सौ. अर्चना अरुण अडसड (रोटे) १२. धारणी : श्री. सुनील चौथमल,

ग्रामसभा घे नाहीतर जिवाने मारेल; नेते गिरी पडली महागात

ग्रामसेवक यांच्या तक्रारीवरून चौघांवर गुन्हे दाखल

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अंजनगाव सुर्जी

अंजनगाव तालुक्यातील कुंभारगावाती गाव पुढाऱ्यांना नेते गिरी चांगलीच महागात पडली आहे.अंजनगाव सुर्जी पंचायत समिती अंतर्गत कुंभारगाव ग्रामपंचायत येथे कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाच्या शासकीय कामकाजात अडथळा आणल्याबद्दल रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानदीप विलास बारब्दे, विलास गणेशराव बारब्दे, प्रविण रामदास मालगे, अमोल प्रमोद पाथरकर, सर्व राहणार कुंभारगाव असे गुन्हा दाखल झालेल्या गाव पुढाऱ्यांचे नाव आहे.

पोलीसांच्या माहितीनुसार कुंभारगाव ग्रामपंचायत कार्यरत ग्रामसेवक भरत निस्ताने यांनी फिर्याद दिली आहे. दि. २५ मंगळवारी रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १० वाजता शासकीय कामकाज करत असताना हे चारही व्यक्ती कार्यालयात आले आणि कार्यालयात येऊन मला म्हणाले की तुम्ही ग्रामसभा कधी घेता ? मागिल सभा आम्हाला मान्य नाही ? असे म्हणत असताना लोटालाटी केली.तर सभा घेतली नाही तर जिवाने मारुन टाकील अशी धमकी देऊन या चारही व्यक्तींनी शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. ग्रामसेवक भरत निस्ताने यांच्या तक्रारीवरून रहिमापुर चिंचोली पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पुढील तपास ठाणेदार अनंतराव वडतकर यांच्या मार्गदर्शनाखाली रहिमापुर पोलीस करीत आहे.

भूकंपाच्या धक्क्यांमुळे शिवणगांव, शिरजगांव या गावातील नागरिकांना मार्गदर्शन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

गेल्या काही दिवसापासून शिवंनगाव फत्तेपूर ,शिरजगाव मोझरी या गावांमध्ये मध्यरात्री जमिनीमधून जोराने आवाज येत असून जमीन हादरत असल्याच्या घटना काही दिवसापासून होत आहे.त्या मुळे या गावातील लोकांमध्ये भीतीचे वातावर निर्माण झालेले आहे.नेमके जमिनीला हादरे कश्या मुळे येत आहे.याचे कारण शोधण्यासाठी काही दिवसा अगोदर स्थानिक प्रशासन तर्फे जोयोलोजिकल टीम प्राचारण करण्यात आली होती.त्यांना सुद्धा नेमके धक्के कशा मुळे याच कारण ते सांगू शकले नाही म्हणून आज संभाजीनगर येथून श्री श्रीनिवास औधकर संचालक एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोल अंतराळ विज्ञान केंद्र संभाजीनगर यांच्या तर्फे गाववासियांचे मार्गदर्शन करण्यात आले.त्यांच्या मते या वर्षी जास्त मिलीमीटर पाऊस झाल्या मुळे आजूबाजूला असलेले तलाव पूर्णता भरलेले आहे आणि विहिरींचे पण पाणी तीन मीटर पर्यंत वाढलेले आहे. त्या मुळे पाण्याचा निचरा जमिनीत न होता तो वर असल्यामुळे भूगर्भामधे पाण्याचे वजन वाढल्या मुळे त्याचा परिणाम या झटक्यांना कारणीभूत असल्या चे शास्त्रज्ञ तर्फे सांगण्यात आले आहे. शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार हे सौम्य धक्के आणखी काही दिवस येणार असून मग ते आपोआप कमी होईल म्हणून गावकऱ्यांनी भीती न बाळन्याचे आवाहन या वेळेला करण्यात आले.त्या वेळेला सरपंच धर्मराज खडसे यांनी भूकंप बाबत प्रास्ताविक करून प्राथमिक माहिती दिली त्या वेळेला सौ औधनकर मॅडम,मयूर कळसे तहसीलदार तिवसा, नागरे साहेब नायब तहसीलदार, नरेंद्र कुरळकर नायब तहसीलदार तिवसा, अभिषेक कासोदे गटविकास अधिकारी पंचायत समिती तिवसा, निलेश श्रीखंडे, श्री.संजय देशमुख, जसबीर ठाकूर,सरपंच धर्मराज खडसे, उपसरपंच सौ राजश्री तेलंगे,ग्रामविकास अधिकारी विनोद खडसे उपस्थित होते.तसेच स्वागत समारंभ करिता प्रियंका ताई चव्हाण राजश्री तेलंगे यांच्या तर्फे करण्यात आले आभार प्रदर्शन व इतर बाबी करता असे विनोद खडसे ग्रामविकास अधिकारी यांनी भूमिका पार पाडली.

तिवसा विकास आघाडीचे NHAI ला निवेदन; राष्ट्रीय महामार्ग-६ वरील बंद पथदिवे व खराब सर्व्हिस रोड तातडीने दुरुस्त करण्याची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६तिवसा

तिवसा शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील बंद पथदिवे सुरू करणे, नवीन पथदिवे बसविणे तसेच सर्व्हिस रोडची दुरुस्ती करण्याबाबत तिवसा विकास आघाडीच्या वतीने मुख्य अभियंता, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छक-ख) आणि आयआरबी टोल प्रकल्प, अमरावती यांना निवेदन सादर करण्यात आले.

तिवसा शहरातून सुमारे दोन किलोमीटर लांबीचा महामार्ग गेल्याने जड वाहतूक सतत सुरू असते. तथापि, गेल्या चार वर्षांपासून या मार्गावरचे पथदिवे पूर्णतः बंद आहेत. अनेक दिवे निकामी झाले असून काही पथदिवे वादळी वाऱ्यामुळे तुटून पडले आहेत. त्यामुळे नवीन पथदिवे बसविणे आणि विद्यमान दिव्यांची तातडीने दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

मंगळवार आणि शुक्रवारच्या आठवडी बाजाराच्या दिवशी महामार्गालगत मोठी गर्दी होत असल्याने पायदळ नागरिक, महिला, वृद्ध आणि दुचाकीस्वारांना अंधारामुळे रात्रीच्या वेळी विशेषतः मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय, सर्व्हिस रोडची स्थिती अत्यंत दयनीय असून खड्डेमय रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणीही आघाडीने केली. तिवसा शहराच्या सुरक्षेसाठी आणि वाहतुकीच्या सुरळीततेसाठी हे काम प्राधान्याने करण्यात यावे, अशी आग्रही मागणी आघाडीने केली.तसेच, एक महिन्याच्या आत या कामांबाबत कोणताही प्रत्यक्ष निकाल दिसून न आल्यास तिवसा विकास आघाडीच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

तिवसात संविधान दिनानिमित्त भव्य 'संविधान सन्मान' बाईक रॅली; शेकडो युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६तिवसा

तिवसा तालुक्यात संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित संविधान सन्मान बाईक रॅली ने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. संविधानाबद्दल जनजागृती व्हावी आणि प्रत्येक नागरिकाने संविधानाचा सन्मान करावा या उद्देशाने ही रॅली भव्य दिमाखात पार पडली. आयोजकांनी नागरिकांना आवाहन केले होते की, देशाप्रती कर्तव्य म्हणून या जनजागृती उपक्रमात सहभागी व्हावे. या आवाहनाला शेकडो युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बाईक रॅलीसाठी सकाळी ९ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीस्थळ, गुरूकुंज मोझरी येथे मोठी गर्दी झाली होती. युवकांच्या मोटारसायकलींवर संविधान दिनाचे संदेश, तिरंगे आणि जागृतीपर फलक लावले गेले होते.

ही भव्य संविधान सन्मान व मतदार जनजागृती बाईक रॅली बुधवार, दि. २६/११/२०२५ रोजी सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत काढण्यात आली. संविधान जागृतीसोबतच मतदार सहभाग वाढविण्याचेही आवाहन रॅलीद्वारे करण्यात आले.

रॅलीचा मार्ग पुढीलप्रमाणे होता :राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीस्थळ, गुरूकुंज मोझरी येथून सुरुवात फशेंदोळा बु. फ सालोरा खु. फ धोत्रा फ शेंदोळा खु. फ फतेपूर फ शिवणगाव फ शिरजगाव मोझरी येथे दुपारी १ वाजता रॅलीचा समारोप झाला.या रॅलीमुळे तिवसा तालुक्यात संविधान मूल्यांची जागृती, मतदार शिक्षण आणि सामाजिक एकोपाचा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याचे आयोजकांनी सांगितले.

माजी सरन्यायाधीश गवईंच्या आईने पंतप्रधान मोदींच्या डोक्यावर हात ठेवले; मोदी म्हणाले, मला आशीर्वाद द्या की

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६नागपूर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अमरावती येथील दसरा महोत्सवाला तत्कालीन सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या आहे कमलताई गवई या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार होत्या. यावरून चांगलाच वाद पेटला होता. यानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कमलताई गवई यांच्यामधील संवादाचा एक व्हिडिओ समोर आलेला आहे. यात कमलताई मोदींना आशीर्वाद देत आहेत. त्यामुळे पुन्हा कमलताई चर्चेत आलेल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी २४ नोव्हेंबर रोजी भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांना सरन्यायाधीश पदाची शपथ दिली. मावळते सरन्यायाधीश भूषण गवई हे रविवारी (२३ नोव्हेंबर) सेवानिवृत्त झाले. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचा शपथविधी सोहळा पार पडला. या सोहळ्याला भूषण गवई हे परिवारासह उपस्थित होते.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूषण गवई यांच्या आई कमलताई गवई यांच्याजवळ जाऊन हितगुज साधला. या प्रसंगातला एक व्हिडिओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे. यामध्ये कमलताई गवई पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर हात ठेवून काहीतरी म्हणताना दिसत आहेत. यानंतर खुद्द कमलताईंनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये या प्रसंगावर स्पष्टीकरण दिलेले आहे.

काय म्हणाल्या कमलताई ?

कमल ताईंनी सांगितले की, शपथविधी सोहळा संपल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्याजवळ आले. यानंतर मोदींनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच वेळोवेळी तुमच्याबद्दल चौकशी करत असतो असेही सांगितले. यादरम्यान पंतप्रधान मोदींनी कमलताई गवई यांचे हात पकडून डोक्यावर ठेवले आणि मला आशीर्वाद द्या असे सांगितले. यावर कमलताईंना विचारण्यात आले की तुम्ही काय आशीर्वाद दिला होता तर, कमलताई म्हणाले की मी विपश्यना करणारी आहे त्यामुळे मी सर्वांना एकच आशीर्वाद देत असते तोच आशीर्वाद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही दिला, सबका मंगल हो हेच मी म्हणाले,असे कमल ताईंनी सांगितले.

अमरावतीत बनावट जन्मदाखल्यांचा मोठा घोटाळा उघड

९६२ जणांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

अमरावतीत बनावट जन्मदाखल्यांच्या प्रकरणाने मोठा वाद निर्माण झाला असून तब्बल ९६२ अर्जदारांनी जन्मदाखल्यांसाठी वेगवेगळ्या तारखांचे संशयास्पद पुरावे दिल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अमरावती महापालिका क्षेत्रातील या गंभीर प्रकाराबाबत तहसीलदार विजय लोखंडे यांनी सखोल चौकशी करून गाडगेनगर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली आहे.

तहसीलदारांनी या प्रकरणातील ९६२ संशयित लाभार्थ्यांची यादी पोलिसांना सुपूर्द केली असून त्यांच्या अर्जातील तारखा, पुरावे व कागदपत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर विसंगती आढळल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे संबंधितांनी खोटी माहिती देऊन जन्मदाखले मिळविण्याचा प्रयत्न केल्याचा संशय अधिक दृढ होत आहे.

पोलिस विभाग आता सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करणार असून, दोषींवर फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे यांसह संबंधित कलमान्वये गुन्हे दाखल होण्याची पूर्ण शक्यता आहे. या घोटाळ्यामुळे महापालिकेच्या नोंद नोंदणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पुढील तपास सुरू आहे.

आता आपल्या मोबाईल वरच वाचा राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

प्रिंट पिडीएफ ई- पेपर वेबपोर्टल

दररोज रात्री 8 वाजता वाचा निवांत!!

सांध्य दैनिक

विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत